अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २१ ऑक्टोबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



श्री. नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



महात्मा जोतिराव फुले

## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ

## उजळे प्रकाश प्रगतीचा
# ध्यास वचनपूर्तीचा




## योजनेचा शुभारंभ
### महाराष्ट्र शासनाची वचनपूर्ती

राज्यातील ७ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये
दि. २० ऑक्टोबर,२०२२ रोजीच्या कार्यक्रमात
मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते
रिमोट क्लीक वरुन रु. २५०० कोटी रक्कम थेट जमा.

### योजनेची वैशिष्ट्ये

- राज्यातील अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५० हजारपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा ऐतिहासिक निर्णय.
- नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देणारे महाराष्ट्र हे देशांतील पहिले राज्य.
- प्रोत्साहनपर लाभ योजनेची संपूर्ण अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीद्वारे.
- २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल घेऊन नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ.
- राज्यात झालेल्या अतिवृष्टी व महापूरामुळे नुकसान झाल्याने नैसर्गिक आपत्ती अंतर्गत कर्जमाफीचा लाभ मिळालेले शेतकरी सुद्धा योजनेस पात्र.
- शेतकरी मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांनी कर्जाची परतफेड केली असल्यास वारस सुद्धा प्रोत्साहनपर योजनेच्या लाभास पात्र.
- राज्यातील अंदाजे १६ लाख पात्र शेतकऱ्यांना रु. ४७०० कोटी प्रोत्साहनपर लाभ देण्याचे प्रस्तावित.
- उर्वरित सर्व पात्र लाभार्थ्यांना नोव्हेंबर २०२२ अखेर लाभ देण्यास राज्यशासन कटिबद्ध

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
महाराष्ट्र शासन


श्री. अतुल सावे
मा. मंत्री (सहकार)

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री

श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री

# खरगेंपुढील आव्हाने

अ. भा. काँग्रेस महासमितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांची निवड झाल्यानंतर काँग्रेस पक्षाचा इतिहास उजळून निघाला आहे. चोवीस वर्षांनी पक्षाच्या अध्यक्षपदाची निवडणूक झाली आणि गांधी घराण्याखेरीज खरगेंच्या रूपाने पहिल्यांदाच या नेत्याला हा बहुमान मिळाला. अशा प्रकारची स्तुतिसुमने उधळली गेली. आता खरगे मनाप्रमाणे पक्ष चालवणार की गांधी घराण्याकडे सतत हेलपाटे मारून निर्णय घेणार हा खरा प्रश्न असून त्याचे उत्तर येणाऱ्या काळात मिळेल, यात शंकाच नाही. खरगेंना गांधी घराण्याचे ऐकावेच लागेल, असे ज्येष्ठ नेते पी. चिरंबरम् यांनी म्हटले आहे. मात्र, एक गोष्ट प्रकर्षाने समोर येतेय, ती म्हणजे खरगेंची कारकीर्द पक्षाला उभारी देणार काय? ८० वर्षीय खरगे यांच्या खांद्यावर पक्षाची पुनर्बांधणी करण्याची महत्त्वाची जबाबदारी असेल. मागील काही वर्षांत काँग्रेसला सतत पराभवाचा सामना करावा लागला. केंद्रीय सत्तेतून हा पक्ष हद्दपार झाला. पुन्हा तिथे सत्ता येण्याची शक्यता कमी दिसते. कारण प्रादेशिक पक्षांचा पुन्हा धुमाकूळ सुरू झाला आहे. पूर्वीप्रमाणे काँग्रेस पक्षाला ते नाचवत राहतील, असे दिसते. त्यामुळे खरगे यांच्यासमोर एक दोन नाही तर अनेक आव्हान आहेत. काँग्रेस हा देशातील सर्वात जुना राजकीय पक्ष आहे. या पक्षाला मोठा वैभवशाली राजकीय इतिहास आहे. पण मागच्या काही वर्षांत काँग्रेसची झालेली अवस्था अस्वस्थ करणारी आहे. त्यामुळे नवीन अध्यक्षाला आता काँग्रेसच्या जुन्या इतिहासात रमून चालणार नाही, त्यांना वस्तुस्थिती लक्षात घेऊन मतदारांचे लक्ष वेधून घेण्यासाठी नावीन्यपूर्ण काम करावे लागेल. लोकांच्या मनात काँग्रेस पुन्हा रुजवण्यासाठी नेहमीपेक्षा वेगळे प्रयत्न करावे लागतील. सध्याच्या राजकीय स्थितीत आपण नेहरू किंवा गांधी कुटुंबाकडून नियंत्रित केले जात नाहीत, असा स्पष्ट संदेश खरगे यांना लोकांमध्ये द्यावा लागेल. अन्यथा ते केवळ नावाला अध्यक्ष झाले आहेत आणि सत्ता दुसऱ्या कुणाच्या तरी हातात आहे, असा संदेश लोकांमध्ये जाऊ शकतो. अशी प्रतिमा बनू न देण्यासाठी खरगे यांना विशेष प्रयत्न करावे लागतील. हे करत असताना गांधी कुटुंबासोबत संघर्ष उद्भवणे काँग्रेसला परवडणारे नाही.



काँग्रेसच्या नेतृत्वाशिवाय देशात विरोधी गट तयार होऊ शकत नाही, असा विश्वास काँग्रेसच्या अन्य नेत्यांप्रमाणे खरगे यांचाही आहे. अध्यक्ष बदलल्याने आता पक्षाची गतिशीलताही बदलली आहे. काँग्रेस पक्ष एकीकडे अस्तित्वाची लढाई लढत असताना, अनेक प्रादेशिक पक्ष आशेचा किरण ठरत आहेत. त्यामुळे संबंधित पक्षातील मतभेद मिटवून विरोधकांमध्ये एकजूट निर्माण करण्याचे आव्हान खरगे यांच्यासमोर असेल. दरम्यान, खरगे यांना अनेक कळीच्या प्रश्नांना सामोरे जावे लागेल. ममता बॅनर्जी, नितीश कुमार आणि उद्धव ठाकरे यांसारख्या प्रादेशिक नेत्यांना निमंत्रित करून त्यांना नेतृत्वाची भूमिका द्यावी लागेल. संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) मध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा लागेल. पक्षाअंतर्गत संघटनात्मक सुधारणा करणे, हे खरगे यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान असेल. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या निवडणुकीसाठी ते पुढे सरसावतील का? हा पहिला प्रश्न आहे. काँग्रेसच्या घटनेनुसार वर्कींग कमिटीत पक्षाध्यक्ष, संसदेतील काँग्रेस पक्षाचा नेता आणि इतर २३ सदस्य असणे गरजेचे आहे. यातील १२ सदस्य हे कमिटीकडून कडून निवडून द्यावे लागतात. त्यामुळे काँग्रेस वर्किंग कमिटीसाठी निवडणूक, संसदीय मंडळाच्या यंत्रणेचे पुनरुज्जीवन आणि लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी तिकिटांचा निर्णय घेणारी वास्तविक केंद्रीय निवडणूक समितीची स्थापना करावी लागेल, या जी-२३ गटातील नेत्यांच्या प्रमुख मागण्या होत्या. या गटातील नेत्यांनी आधीच खरगे यांना पाठिंबा दिला आहे. पक्षातील तरुण आणि दिग्गज नेत्यांमधील दरी कमी करणे, हे खरगे यांच्यासमोरील मोठे आव्हान आहे. एआयसीसीचे उमेदवार म्हणून खरगे यांच्याकडे पाहिले जात होते. यामुळे-ICCमधील सर्व वयोगटातील नेत्यांनी त्यांना पाठिंबा दिला. पण तरुण आणि दिग्गज नेत्यांमधील दरी अनेक राज्यांमध्ये दिसून येते. विशेषत: राजस्थानमध्ये अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यात मागील काही वर्षांपासून वाद धुमसत आहे. केवळ राजस्थानच नव्हे तर केरळ, तेलंगणा, गोवा, दिल्ली आणि पंजाब यांसारख्या राज्यांमध्येही असा वाद सुरू आहे. त्यातल्या त्या खडतर प्रवास म्हणजे मोदी लाट कशी संपवणार? देशाची मानसिकता कशी बदलणार? पक्षापुढे कार्यक्रम काय आहे? असे एक ना अनेक प्रश्न त्यांच्यापुढे असतील.

खाद्यसंस्कृती

# दिवाळी फराळ : परंपरा, व्याप्ती आणि बदलते स्वरूप

**दिवाळी आणि फराळ हे समीकरण असून दिवाळीची कितीही तयारी केली तरी ती फराळाशिवाय पूर्ण होत नाही. दिवाळीनिमित्त प्रत्येक भारतीय घरात फराळ तयार होतो. हा दिवाळीचा फराळ देशभरात सर्वत्र तर पाठविला जातोच, शिवाय परदेशातील मराठी कुटुंबीयांकडूनही फराळाच्या पदार्थांना मागणी वाढत असून दर वर्षी पुण्यातून हजारो किलो फराळ जगभरातील विविध देशांमध्ये रवाना होत असतो. यानिमित्ताने दिवाळी फराळाची परंपरा,प्रयोजन, व्याप्ती आणि बदलते स्वरूप याविषयी थोडक्यात...**

दिवाळी किंवा दीपावली हा सर्व भारतात साजरा केला जाणारा एक प्रमुख सण असून यावेळी घरात आणि घराबाहेर दिवे लावून तसेच घरासमोर रांगोळी काढून सुशोभन केले जाते. उपलब्ध माहितीनुसार दिवाळी हा सण सुमारे तीन हजार वर्षापासून साजरा होत असून पावसाळ्यातील समृद्धीचा, आनंदाचा आणि कृतज्ञतेचा सोहळा मानला जातो. पावसाळ्यानंतर नवीन पिके हाती आल्यावर शरद ऋतूच्या मध्यास, आश्विन आणि कार्तिक महिन्यातील आश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तिक शुद्ध प्रतिप्रदा या चार दिवसांमध्ये साधारणपणे ऑक्टोबर- नोव्हेंबर मध्ये हा सण येतो. महाराष्ट्रात व इतर काही भागात दिवाळीला लहान मुले मातीचा किल्ला तयार करून त्यावर मातीची खेळणी मांडतात. याशिवाय दिवाळीच्या वेळी प्रत्येक घरात आणखी एक गोष्ट केली जाते ती म्हणजे दिवाळी फराळ. प्रांतागणिक फराळातील पदार्थ बदलले जातात पण फराळाशिवाय दिवाळी अपूर्ण होय. महाराष्ट्रातील फराळामध्ये विशेषत: लाडू, चकली, करंजी, चिवडा, शेव, शंकरपाळी आणि अनारसे यांची रेलचेल असते. फराळामुळे दिवाळीची रंगत खऱ्या अर्थाने वाढते असे म्हटल्यास त्यात काही वावगे वाटणार नाही, इतके दिवाळी आणि फराळाचे घटत नाते जुळले आहे. फराळामुळे दिवाळीचा आनंद द्विगुणित होतो. दिवाळी फराळ ही एक परंपरा मानली जाते. दिवाळी आणि फराळ भारताच्या शेतीप्रधानतेला जोडलेले असून शेतीच्या दिवसात कष्ट करून थकलेल्या शेतकऱ्याचा निवांत होण्याचा हा काळ असतो. या काळात गोडधोड खाऊन तेलकट, तुपकट आणि गोड पदार्थांच्या माध्यमातून येणाऱ्या थंडीसाठी तो शरीरात स्निग्धता साठवून घेत असतो. या प्रयोजनाने दिवाळीचं निमित्त साधून फराळाची परंपरा निर्माण झाली असावी.

दिवाळीमध्ये शेजारी, नातेवाईक व मित्रमंडळींना फराळाचे डबे देण्याच्या हिशोबानेच घरोघरी फराळ बनवला जातो. मात्र आता हा फराळ थेट परदेशी पाठविला जाऊ लागला आहे. परदेशातील नातेवाईक, व्यावसायिक भागीदार किंवा कंपनीच्या परदेशातील शाखेतील सहकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून हा फराळ पाठविला जातो. याकरिता मिठाई दुकानदार व फराळ तयार करणारे व्यावसायिक परदेशी पाठविण्यासाठी तयार पॅकही उपलब्ध करून देऊ लागले आहेत. विविध कुरिअर कंपन्या हा फराळ पाठविण्याचे काम करतात.

दरवर्षी पुण्यातून हजारो किलो फराळ अमेरिका, कॅनडा आदी विविध देशांमध्ये पाठविण्यात येतो. या माध्यमातून कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत असून या निमित्ताने मिठाई, रेडिमेड फराळ व्यावसायिक व विविध कुरिअर कंपन्यांना व्यवसाय मिळत आहे, बरोबरीनेच परदेशस्थ भारतीयही दिवाळीच्या पारंपरिक, पौष्टिक आणि रुचकर फराळाचा स्वाद घेत आहेत. गेल्या काही वर्षांत बहुतेक देशांनी खाद्यपदार्थांवर असणारे निर्बंध कमी केल्यामुळे दिवाळीचा फराळ पाठविण्याचे प्रमाण वाढले आहे. मागील पाच वर्षांपासून परदेशातून फराळाच्या पदार्थांची मागणी वाढली असून अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इंग्लंड, सिंगापूर, मलेशिया, दुबई आदी देशांमध्ये यंदा चिवडा, चकली, बेसन लाडू या पदार्थांना मोठी मागणी असल्याचे महाराष्ट्र केटरिंग असोसिएशनच्या अध्यक्षांनी सांगितले होते.



तथापि, अलिकडच्या काळात दिवाळीच्या आठवडाभर आधीपासून एकेक पदार्थ तयार करून कुटुंबीयासोबतच शेजारी, नातेवाईक व मित्रमंडळींना आग्रहाने देण्याची परंपरा इतिहास जमा होऊ लागली आहे. विभक्त कुटुंबांची तसेच पती-पत्नी दोघेही नोकरी करणाऱ्या कुटुंबांची संख्या वाढत चालल्याने दिवाळीच्या फराळाच्या एकेक पदार्थासाठी स्वयंपाकघराचे युद्ध घर न करता, चटपट एक दोन पदार्थ घरी बनवून इतर फराळ रेडिमेड खरेदी करण्याकडे लोकांचा कल वाढू लागला आहे. मात्र विकतचा फराळ मोजकाच असल्याने पूर्वीसारखे मोठे डबे भरून ठेवता येत नाहीत. त्यामुळे गेल्या काही वर्षापासून शेजारी, नातेवाईक व मित्रमंडळींना पारंपरिक फराळाऐवजी मिठाई देण्याचा पर्याय पुढे आला होता. परंतु हल्लीच्या कोलेस्टेरॉल आणि कॅलरी बाबत जागरूक जमान्यात तुपसाखरात घोळलेली मिठाई दिवाळी संपली तरी शीतकपाटात पडून राहण्याचे चित्र दिसत आहे. म्हणून मिठाईकडेही पाठ फिरवून लोक आता सुक्या मेव्याचा पर्याय अवलंबत आहेत. लवकर संपवण्याची सक्ती नसल्याने, आरोग्यास उत्तम असल्याने आणि अगदी पाव किलोच्या आकर्षक पॅक मध्ये ही मिश्र सुका मेवा उपलब्ध होत असल्याने, सर्वसामान्यांनीही आपला मोर्चा तिकडे वळवला आहे. शेवटी कालाय तस्मेय नमः.

**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**

टुडेज ब्लॉग

# समस्यांवर तोडगे आहेत का?

**ऑक्टोबर मध्यापर्यंत लांबलेल्या पावसाला परतीचा पाऊस, अवकाळी पाऊस किंवा अतिवृष्टी म्हटले तरी पावसाचा हंगाम लांबलेला आहे हे मात्र खरे. निसर्ग आणि पाऊस यांच्या बदललेल्या चक्रांमुळे शेतातील पाणी बाहेर कधी जाणार, उरलेली शेतीची कामे पूर्ण करून शेतमाल बाजारात केंव्हा पाठवायचा ह्या काळजीने त्रस्त झालेला शेतकरीवर्ग चिंतांनी वेढला गेला आहे.**

हवामान खाते अजून काही दिवस ग्रामीण आणि शहरी भागात पाऊस हजेरी लावत राहणार आहे असे अंदाज वर्तवीत आहे. कधीकाळी चातकाप्रमाणे पावसाची वाट पाहणारा बळीराजा सध्या पाऊस परतणार कधी त्याची वाट पाहत आहे. कारण परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या उरल्या सुरल्या स्वप्नांवर पाणी फेरले आहे. काही ठिकाणी लम्पी या जनावरांच्या आजाराने तर अतिवृष्टी, ढगफुटी झालेल्या भागात पशुधनाचेही नुकसान झाले आहे. त्यांचे पुढील हंगामाचे नियोजनाची व तयार मालाच्या विक्रीची समीकरणे बदलली आहेत. परिणामी सर्वच आर्थिक गणिते बिघडली आहेत. विदर्भ, मराठवाड्यात अतिवृष्टीने शेतमालाचे प्रचंड नुकसान झाल्यामुळे बळीराजा हतबल झाला आहे. एकतर मेहनत घेऊन आलेलं उभे पीक वाया गेले आहे. सोयाबीन, तूर, मका, बाजरी पिके हातातून निसटली आहेत. फळबागा, भाजीपाला यांनाही अतिवृष्टीचा फटका बसला आहे. ह्या परिस्थितीचा विचार करून ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या शेतकऱ्यांच्या मागणीचाही विचार सरकार करीत नाही. अशा वेळी निदान सरकारने शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदतीचा हात पुढे करणे आवश्यक होते. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले गेले आहेत. परंतु स्थानिक पातळीवरील प्रशासक त्याबाबत फारसे गंभीर नाहीत असे दिसून येते. वास्तविक पंचनामे करून झाल्यावर सरकारी निकषांप्रमाणे अटी, शर्थी, नियमांचे पालन करून उघडलेल्या बँक खात्यात नुकसान भरपाईची रक्कम त्वरित जमा करणे सहज शक्य झाले आहे. सरकारकडून जाहीर होत असलेली, अनुदाने, अतिवृष्टी, गारपीट वगैरेंनी झालेल्या नुकसान भरपाईची रक्कम पदरी पाडून घेण्यासाठी शेतकऱ्यांना सरकारी कार्यालयांचे उंबरे झिजवावे लागतात. मेहनतीची योग्य दखल घेतली जात नाही, नुकसान भरपाईसाठी सरकारी अधिकारी, त्यांच्या कार्यालयांत वारंवार भेटीगाठी घेतल्यावर मिळतात ती तोंडी आश्वासने. कौटुंबिक ताण, तणाव, समस्या व शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे शक्य होऊ न शकल्यामुळे, ताण सहन न झाल्यामुळे कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांना सहानुभूती, पुरेशी आर्थिक मदत मिळते का याबद्दल अधिक माहिती मिळू शकत नाही. अशा प्रसंगांसाठी सरकारकडून कायमस्वरूपी उपाययोजना किंवा नियमावली मंजूर करून घेण्यात स्थानिक पातळीवरील कुणी नेते पुढाकार घेण्याचे स्वारस्य दाखवीत नाहीत हे कुठेतरी खटकते. काही संकटे उद्भवल्यास त्यावर प्रसंगानुरूप तात्पुरते तोडगे काढले जातात. तरीही जनतेने निवडलेले प्रतिनिधी सभागृहांत चर्चाद्वारे ठराव संमत करून दीर्घकालीन कायदेशीर तरतुदी करण्याचे धाडस करीत नाहीत याचे दुःख होतेच.

दुसरीकडे शेतकऱ्यांना हंगामी पीक काढण्यासाठी जी काही कर्जे घ्यावी लागतात त्यांसाठी रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार सिबीलचेही निकष लागू केले आहेत. त्यांची पूर्तता करण्यासाठीचे निकष शेतकऱ्यांना आडकाठी ठरत आहेत. नवनवी धोरणे राबविणाऱ्यांनी शेतीविषयक प्रश्नांचे राजकारण करून ठेवले आहे. त्यात होणारी कोंडी शेतकऱ्यांच्या मनात असंतोष निर्माण होत आहे. शेतीमालाचे पडते भाव, भावांचे नियंत्रण, ओला किंवा कोरडा दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी वादळे अशा आपत्तींमुळे अंदाजित उत्पन्न येत नाही, परिणामी शेतकऱ्यांमध्ये कर्जफेड करण्याजोगी आर्थिक क्षमता निर्माण होत नाही मग कर्जफेड तर दूर राहते. कर्जफेड न करू शकल्यामुळे आत्महत्या करण्याचा निर्णय शेतकरी बांधव घेतात. त्यामागील कारणांचा अभ्यास केला जात नाही. तसा शेतकरी बांधव करबुडवा नसतो त्याचप्रमाणे तो कर्जबुडवा देखील नसतो. त्याच्यावर येणारे दडपण असह्य होऊन बसते तेव्हा नाईलाजास्तव आपले जीवन संपवितो. शेतीपायी जीव गमावून बसलेल्या शेतकऱ्यांची पुढची पिढी शेती करावी की उच्च शिक्षण घ्यावे, असे प्रश्न समोर उभे राहिल्यामुळे द्विधा मनस्थितीत जाऊन चांगलीच गोंधळलेली आहे असे जाणवते.




अनुदाने, कर्ज वाटप करतेवेळी सरकारांनी बँकांमध्ये वर्ग करण्यात आलेल्या रक्कम बड्या शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत असल्याच्या छोट्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. अशा तक्रारींची थोडीफार कल्पना असूनही शीघ्र गतीने उपाय का बरे होत नाहीत? ज्या शेतकरी बांधवांनी कोरोना प्रादुर्भाव काळात कोणत्याही तक्रारी, मागण्या पुढे न करता पिके घेऊन देशवासीयांवर उपासमारीची वेळ येऊ दिली नाही त्या शेतकरी बांधवांना आस्थेने नको, परंतु कर्तव्यनिष्ठेने बजावलेल्या कामगिरीपोटी आश्वासित केलेली मदत देताना हात आखडते घेऊ नयेत या अपेक्षा आहेत. बांधावर जाऊन विचारपूस, चौकशी केल्यावर आपण दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कितपत झाली आहे, त्यात काही बदल, अडथळे झालेले आढळल्यास ते दूर करण्यासाठी काय उपाय आहेत याचा तपास करत पाठपुरावा केला असता तर सरकार आणि शेतकरी बांधव यांमधील अंतर जोडणाऱ्या सर्व प्रशासकीय यंत्रणा वेळीच सतर्क होऊन निधी वाटप कामास गती प्राप्त झाली असती. शिवाय आपण सरकारवर दाखविलेला विश्वास सार्थकी लागला असा समज समग्र शेतकरी बांधवांमध्ये निर्माण झाला असता. जो तो नेता आपल्या स्वार्थापायी झटतो, सर्वांसाठी झटणाऱ्या शेतकरी बांधवांसाठी मात्र आश्वासनांची खैरात केली जाते. त्यांची पूर्तता होते किंवा नाही हे पाहण्यासाठी वेळ कुणालाच नसतो. कारण सर्वच आश्वासने पूर्ण केली तर पुढच्या टर्ममध्ये पुन्हा काय आश्वासित करायचे ? असे नवे प्रश्न उद्भवतात. म्हणूनच प्रत्येक शेतकरी बांधवाच्या नशिबी येणारे हे एक न थांबणारे कालचक्र बनून राहिले आहे असे वाटते.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी.**

जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल -१



धर्म म्हणजे काय? धर्माचा संग्रह कसा करावा? याविषयी येथे विचार केलेला आहे. धर्मसंग्रहाचे एकूण दहा मार्ग येथे सांगितले आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप आणि ध्यान हे दहा धर्माचार होत. तुम्हांला धार्मिक व्हायचे असेल, धर्माचा संग्रह करायचा असेल तर त्यासाठी हे दहा मार्ग आहेत. यांपैकी कोणत्याही एका मार्गाने तुम्ही धर्मसंग्रह करू शकता.

**अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्य दया क्षमा ।**
**दानं पूजा जपो ध्यानमिति धर्मस्य संग्रह: ।।१९६.५९।।**

'अहिंसा' हा पहिला धर्म होय. मनुष्य अत्यंत स्वार्थी असतो. दुसऱ्याला दुःख देऊन तो सुख मिळवू पाहतो.

दुसऱ्यांना दुःख देणे ही मनुष्याची सामान्य प्रवृत्ती असते. तिचे नियंत्रण करण्यासाठी अहिंसा हा पहिला धर्म सांगितला आहे. म्हणून 'अहिंसा परमो धर्म:।' असे म्हटले जाते. प्रत्येक मनुष्यात निर्माणशक्ती आणि विनाशशक्ती असते. मनुष्य काही घडवू शकतो आणि काही बिघडवू शकतो. घडवणे चांगले, बिघडवणे बाईट. माणसाने सतत काही घडवले पाहिजे. दुसऱ्याने काही घडवले तर ते बिघडवू नये. सामान्यतः बिघडवण्याचीच प्रवृत्ती मनुष्यात अधिक आढळते.

एखाद्या जीवाचा प्राण घेणे म्हणजे हिंसा होय. हिंसा हा अधर्म आहे. मनुष्याने कधी हिंसा करू नये. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांची सृष्टी, पालन आणि संहार अशी अनुक्रमे तीन कार्ये आहेत. त्यांपैकी पहिली दोन कार्य करण्याची शक्ती मनुष्याला प्राप्त झाली आहे. जीवाची निर्मिती करण्याचे आणि त्याचे पालन करण्याचे सामर्थ्य मनुष्याजवळ आहे. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# दिवाळी शुभेच्छांचे बदलते स्वरूप

जनमानस

पूर्वी शाळेत असताना दिवाळीच्या आधी हस्तकला विषयाचे शिक्षक आमच्याकडून कार्ड पेपरपासून शुभेच्छा कार्ड बनवून घ्यायचे. त्याच्या मुखपृष्ठावर सुरेख असे चित्र काढून आतल्या पानावर आपल्या नातेवाईकांसाठी दिवाळीचा शुभेच्छा संदेश लिहून खाली तळाला आपल्या नावासह स्वाक्षरी केली जायची. अशी शुभेच्छा कार्ड्स दिवाळीच्या सुटीत हाती बनवून ती नातेवाईकांना पोस्टाने पाठवली जात असत. अशा प्रकारची रंगीबेरंगी शुभेच्छा कार्ड्स भेटवस्तूंची दुकानातही मिळत असत, पुढे ती विकत घेऊन पाठवू लागलो. दिवाळीच्या निमित्ताने अशी वेगवेगळ्या प्रकारची शुभेच्छा कार्ड्स विकत घेऊन ती आपल्या आप्तेष्टांना पाठवण्यात आणि त्यांच्याकडून ती मिळाल्याची पोच आल्यानंतर मिळणारा आनंद काही औरच होता. ज्यांना ती कार्ड्स पाठवली जायची तेही ती जपून ठेवत असत. आता मात्र शुभेच्छा कार्डाची जागा व्हाट्स अप संदेशांनी घेतली आहे. सणांच्या निमित्ताने कोणाकडून तरी आपल्याला आलेल्या शुभेच्छांच्या इमेजेस आणि संदेश इतरांना फॉरवर्ड करणे इतकाच काय तो सोपस्कार करण्याची प्रथा आता पडली आहे. स्वतः संदेश तयार करण्याचे कष्टही हल्ली कोणी घेताना दिसत नाही. त्यामुळे असल्या फॉरवर्डेड संदेशांना शुभेच्छा तरी म्हणता येईल का? स्वतः शुभेच्छा कार्ड बनवून दिलेल्या शुभेच्छांमधील प्रेमाचा ओलावा असल्या फॉरवर्डेड संदेशांमध्ये कुठे आहे? प्रत्येक सणांच्या वेळी असे ढीगभर संदेश आणि इमेजेस व्हॅट्सऍपवर येऊन पडलेले असतात, मग सणांच्या दुसऱ्या दिवशी मोबाईलची मेमरी स्पेस रिकामी करण्यासाठी हे मेसेजेस डिलीट केले जातात. अनेकदा ते वाचलेही जात नाहीत. त्यामुळे असल्या शुभेच्छांनी प्रेमाची देवाणघेवाण होणार आहे का?

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

# वसुबारस तिथी पूजन, नियम, महत्त्व व मान्यता

**वर्षभरात येणारे सण-उत्सवांचा राजा मानल्या गेलेल्या दीपोत्सवाची सुरुवात वसुबारस सणाने केली जाते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथे पशुधनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतीय संस्कृतीत गाईला मातेचा दर्जा देण्यात आला असून, ती पूजनीय मानली गेली आहे. तिच्याप्रतीच्या कृतज्ञतेतून वसुबारस या दिवशी गाय आणि तिचे वासरू यांची पूजा केली जाते. यंदा एकादशीलाच वसुबारस साजरा केला जाईल, वसुबारस सण कसा साजरा करतात? या दिवशी काय करावे आणि काय करू नये? वसुबारसचे व्रत कसे करावे? जाणून घेऊया...**

**दिवाळीचा पहिला दिवस** - अंध:काराकडून प्रकाशाकडे तर अज्ञानाकडून ज्ञानाकडे नेणारा सण म्हणजे दीपावली. वसुबारस म्हणजेच गोवत्सद्वादशी हा दिवस दिवाळीला जोडून येतो, म्हणून त्याचा समावेश दिवाळीत केला जातो; पण वस्तुत: तो सण वेगळा आहे. मात्र, देशातील बहुतांश ठिकाणी वसुबारसेपासून दिवाळीला सुरुवात होते, असे मानले जाते. यंदा शुक्रवार, २१ ऑक्टोबर २०२२ रोजी निज अश्विन कृष्ण एकादशीला वसुबारस आणि रमा एकादशी आहे, त्यामुळे यंदाच्या वसुबारसला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या होत्या. त्यातून नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हा सण साजरा केला जातो, अशी मान्यता आहे. वसुबारस या शब्दातील वसू म्हणजे धन (द्रव्य), त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी.

**वसुबारस पूजन** : - या दिवशी जे व्रत करतात त्यात सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सकाळी अथवा सायंकाळी सवत्स गायींची पूजा करतात व पुढील मंत्राने तिची प्रार्थना करतात -

**तत: सर्वमये देवी सर्वदेवैरलङ्कृते ।**
**मातर्ममाभिलषितं सफलं कुरू नन्दिनि ।।**

हे सर्वात्मक व सर्व देवांनी अलंकृत अशा नंदिनी माते, तू माझे मनोरथ सफल कर, असा याचा अर्थ आहे. या दिवसापासून अंगणात रांगोळी काढून दिवाळी सणाची सुरुवात होते. या दिवशी तेलातुपात तळलेले पदार्थ आणि गाईचे दूध, तूप व ताक खात नाहीत. उडदाचे वडे, भात व गोडधोडाचे पदार्थ करून ते गाईला खाऊ घालतात. उत्तरप्रदेशात त्या व्रताला 'बछवाँछ' असे म्हणतात. घरात लक्ष्मी देवींचे आगमन व्हावे या हेतूनेही यादिवशी वासरू असलेल्या गाईची पूजा करण्याची पद्धत आहे. घरातील सवाष्ण बायका गाईच्या पायावर पाणी घालतात. हळद-कुंकू आणि अक्षता वाहतात. ज्यांच्या घरी गुरे, वासरे आहेत, त्यांच्या घरी पुरणाचा स्वयंपाक केला जातो. मग गाईला निरांजनाने ओवाळून केळीच्या पानावर पुरणाचा नैवेद्य खायला दिला जातो. समुद्रमंथनातून उत्पन्न झालेल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे.



भारतीय संस्कृतीप्रमाणे गायीला फार महत्त्व आहे. तिला माताही म्हणतात. ती सात्त्विक असल्याने सर्वांनी या पूजनाद्वारे तिच्या सात्त्विक गुणांचा स्वीकार करावा, असे म्हटले जाते. सत्त्वगुणी म्हणजेच आपल्या सहवासाने दुसऱ्याला पावन करणाऱ्या, आपल्या दुधाने समाजाला बलिष्ठ करणाऱ्या, आपले अंग-प्रत्यंग अर्पण करून समाजाला उपयोगी पडणाऱ्या, शेतीला आपल्या शेणाद्वारे खत देऊन पौष्टिकत्व आणणाऱ्या, शेतीला उपयुक्त अशा बैलांना जन्म देणाऱ्या गोमातेचे या दिवशी पूजन करतात. ज्या ठिकाणी गोमातेचे संरक्षण, संवर्धन होऊन तिला पूज्यभाव देऊन तिचे पूजन होते, त्या ठिकाणी ती व्यक्ती, तो समाज, ते राष्ट्र भरभराटीस आल्याशिवाय राहत नाही, असे सांगितले जाते. अशा गोमातेचे प्रथम तिच्या वत्सासहित पूजन करून दीपोत्सवाला सुरुवात होते.

वसुबारस सणाच्या दिवशी गहू, मूग खात नाही. महिला या दिवशी दिवसभर उपास करतात. बाजरीची भाकरी आणि गवारीच्या शेंगांची भाजी खाऊन उपास सोडतात. या दिवशी दूध, दुधाचे पदार्थ, तळलेले तसेच तव्यावर बनवलेले पदार्थ खात नाहीत, अशी लोकमान्यता असल्याचे सांगितले जाते.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २१ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : २४ वा किंमत : ५ रुपये



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

| शुक्रवार, दि. २१ ऑक्टोबर २०२२ |



# राज्य सरकारकडून दिवाळी गिफ्ट

✔ सुराज्य/मुंबई

**नियमित कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम जमा करण्याचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. एकाच वेळी राज्यातील ६ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे २५०० कोटी रुपये जमा करण्यात आले. अशा प्रकारे एकाचवेळी थेट खात्यात रक्कम जमा करणारे महाराष्ट्र पहिले राज्य असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीमुळे बळीराजाने खचून जाऊ नये राज्य सरकार पाठीशी असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.**

## ▪ सात लाख शेतकऱ्यांच्या खात्यात २५०० कोटी रुपये जमा



दरम्यान, शेतीच्या नुकसानीचे पंचनामे उपग्रह आधारीत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करतानाच त्याची भरपाई ऑटोपायलट मोडच्या माध्यमातून देण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून अल्प मुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ योजनेचा शुभारंभ मंत्रालयात झाला. मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास सहकारमंत्री अतुल सावे, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, ग्रामविकासमंत्री गिरीष महाजन, कृषीमंत्री अब्दुल सत्तार, बंदरे व खनीकर्म मंत्री दादाजी भुसे, उद्योगमंत्री उदय सामंत, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व जिल्हाधिकारी, लाभार्थी शेतकरी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

**सध्या राज्यात परतीच्या पावसाने शेतीचे नुकसान झाले असून त्याचे पंचनामे तातडीने करून शेतकऱ्यांना मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. अतीवृष्टीमुळे शेतकऱ्यांनी खचून न जाता धैर्याने संकटाला सामोरे जा शासन आपल्या पाठीशी असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.**

राज्यातील शेतकरी बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा देऊन मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले, 'नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याचा निर्णय आम्ही घेतला शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा हा विषय असून त्याची तातडीने अमंलबजावणीही केली. शेतकऱ्यांची दिवाळी गोड झाली पाहिजे म्हणून दिवाळी पूर्वी लाभाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश विभागाला दिले होते. त्यानुसार विभागाने तातडीने कार्यवाही केल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागांचे अभिनंदन केले.



**योजनेचा लाभ देण्यासाठी पात्र शेतकऱ्यांच्या आधारक्रमांकाचे प्रमाणीकरण करण्यात आले असून सध्या सुमारे ८ लाख शेतकऱ्यांच्या आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण झाले आहे. त्यापैकी ६ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्यात आल्याचे सहकारमंत्री सावे यांनी सांगितले. यावेळी सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार यांनी प्रास्ताविक केले कर सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी आभार मानले.**

शेतकरी केंद्रबिंदू मानून आम्ही निर्णय घेतले आहेत. एनडीआरएफच्या दुप्पट निधी देणे, नुकसान भरपाईसाठी दोन ऐवजी तीन हेक्टरची मर्यादा करणे, सततच्या पावसात निकषता न बसणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करणे, रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना मान्यता देऊन जास्तीत जास्त जमीन ओलीताखाली आणून शेतकरी बांधवांना दिलासा देणारे निर्णय आम्ही घेतले आहेत.

उपमुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले, 'आम्ही सत्तेत आल्यानंतरच्या पहिल्याच बैठकीत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आणि त्याची अंमलबजावणीही केली. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा होण्यासाठी ह्यावेळेस पहिल्यांदाच एका क्लिकवर निधी जमा करण्यात आला आहे. दिवाळीपूर्वी ही रक्कम जमा झाल्याने शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. अतिवृष्टीमुळे कालपर्यंत झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य शासनाने शेती आणि शेतकऱ्यांसाठी विविध निर्णय घेतले असून अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करण्यासाठी उपग्रह आधारित यंत्रणा करण्यात येत आहे. त्यानंतर ऑटोपायलट मोडमध्ये विमा रक्कम मिळावी यासाठी तंत्रज्ञान तयार केले जात असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

## शहराचा २० वर्षांसाठीचा आराखडा २ वर्षात तयार होणार

**▪ हैदराबादच्या आरएसआय कंपनीकडून कामास सुरुवात**

✔ सुराज्य/सोलापूर

महानगरपालिकेच्या वतीने शहराच्या पुढील २० वर्षाचा विकास आराखडा (डेव्हलपमेंट प्लॅन) तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हा संपूर्ण आराखडा तयार करण्याचे काम सन २०२४ पर्यंतपूर्ण होणार असल्याची माहिती महापालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली.

महापालिकेच्या वतीने हैदराबाद येथील आरएसआय या कंपनीला हा विकास आराखडा तयार करण्याचे काम देण्यात आले. या कंपनीकडून शहरातील १७८ चौरस किलोमीटर ड्रोन सर्वे चे काम पूर्ण झाले आहे. याचा संपूर्ण डाटाही पुणे जमावबंदी आयुक्तांकडे पाठविण्यात येणार आहे. हा आराखडा तयार करण्यासाठी कर्मचारी नियुक्त करण्याची प्रक्रिया शासनाकडून करण्यात येणार आहे महापालिका त्याचे पैसे अदा करणार आहे.

**महापालिका आयुक्तांमुळे १२ कोटींची बचत**

ड्रोन सर्वेक्षणाचे काम झाले आहे. या ड्रोन सर्वेक्षणासाठी इतर महापालिकांना सुमारे १४ कोटी रुपयांचा खर्च आला होता मात्र सोलापूर महानगरपालिकेने हेच काम सबंधितांकडून केवळ दीड कोटी रुपयांमध्ये पूर्ण केले आहे. महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांच्या प्रयत्नामुळे महापालिकेची सुमारे १२ कोटी ५० लाख रुपयांची बचत झाली आहे.

महापालिकेच्या निवडणूक कार्यालयाजवळ याचे कार्यालय राहणार आहे. तेथूनच शहरातील सर्व प्रकारची कार्यवाही होणार आहे. चालू विकास आराखड्याची मुदत सन २०२४ पर्यंत यापूर्वी १९९७ मध्ये चालू विकास आराखडा तयार करण्यात आला होता. त्याला सन २००४ मध्ये मान्यता मिळाली होती. शहरातील सध्या चालू असलेल्या विकास आराखड्याची मुदत ही सन २०२४ मध्ये संपणार आहे. त्यापूर्वी नवा आराखडा तयार करण्यात येण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सांगितले.

## जागतिक नेमबाज रुद्रांक्ष वाघमोडे-पाटील याला २ कोटी; मुख्यमंत्र्यांची घोषणा

✔ सुराज्य/सोलापूर

माळशिरस तालुक्यातील भांबुर्डी गावचे सुपुत्र आणि सध्या पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांचा मुलगा रूद्रांक्ष पाटील याने जागतिक नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक पटकविले असून आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री शिंदे व फडणवीस यांनी रूद्रांक्षचे अभिनंदन केले.



राज्य मंत्रिमंडळाने अभिनंदनाचा ठराव करीत त्यांना रोख २ कोटी रुपये देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. कैरो येथे झालेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेतील दहा मीटर रायफल्स स्पर्धेत भारताचा नेमबाज रुद्रांक्ष बाळासाहेब पाटील यांनी वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं. त्याबद्द्ल बैठकीच्या सुरुवातीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी रुद्रांक्ष पाटीलने केलेल्या कामगिरीची माहिती दिली. २०२४ ला फ्रान्समध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेचा पहिला कोटा त्याला मिळाला आहे. वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी त्याने ही कामगिरी केली आहे. रूद्रांक्ष पाटील यांचेवर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## परिवहनचे मल्लाव यांच्या जागेवर बोजा चढवा

**▪ महापालिका परिवहनचे पाठविले शिरुर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना पत्र**

✔ **सोलापूर** : महापालिका परिवहन उपक्रमातील बस क्यूशेड जाहिरात घोटाळा प्रकरणी ६ लाख ८ हजार आणि दहा लाख रुपये वेतन घेतलेले अग्रिम समायोजन न केल्याने परिवहनच्या नुकसान भरपाई पोटी महापालिका परिवहन विभागाचे तत्कालीन व्यवस्थापक अशोक मल्लाव यांच्या शिरूर येथील जागेवर बोजा चढविण्याचे पत्र परिवहन व्यवस्थापक तथा महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी तेथील नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना पाठविले आहे.

सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमात बस क्यूशेड जाहिरात घोटाळा प्रकरणी तत्कालीन व्यवस्थापक मल्लाव यांच्यासह तीन अधिकाऱ्यांना एका महिन्यात परिवहनच्या १८ लाख नुकसानीची भरपाई करा अन्यथा फौजदारी कारवाई करण्यात येईल , अशा नोटिसा धाडण्यात आल्या होत्या. तत्कालीन व्यवस्थापक अशोक मल्लाव यांच्यासह कार्यालयीन अधीक्षक नि लेखापाल श्रीशैल लिगाडे (बडतर्फ) आणि सेवानिवृत्त झालेले प्रमुख मुख्य वाहतूक निरीक्षक भारत हनुमंत कंदकुरे अशा तिघांकडून या नुकसानाची भरपाई त्यांना विभागून प्रत्येकी ६ लाख ८ हजार ८० रुपये इतके परिवहन उपक्रम प्रशासनाकडे २८ ऑक्टोबरपर्यंत भरावे लागणार होते तसेच मुदतीत नुकसान भरपाईची ही रक्कम प्रशासनाकडे जमा न केल्यास त्यांच्या मिळकतीतून जमा करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. देण्यात आलेली एक महिन्याची मुदत संपल्याने पुढील कारवाई हाती घेण्यात आली आहे. त्यांनी परिवहनच्या नुकसान भरपाई पोटी महापालिका परिवहन विभागाचे तत्कालीन व्यवस्थापक अशोक मल्लाव यांच्या शिरूर येथील जागेवर (मिळकत) बोजा चढविण्याचे पत्र आयुक्त पी. शिवशंकर यांनी पुणे जिल्ह्यातील शिरूर नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना पाठविले आहे.



शाळेवरून परतत असताना परतीच्या पावसात भिजण्याचा आनंद लुटणाऱ्या शाळकरी विद्यार्थीनी तर दुसऱ्या छायाचित्रात जुना पुना नाका येथील तुडूंब भरलेला नाला

## पोलीस अधीक्षकपदी सरदेशपांडे

✔ **सोलापूर** : ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांची अखेर बदली झाली आहे. त्यांच्या जागेवर सोलापूर ग्रामीणच्या पोलीस अधीक्षक पदी पोलीस अकादमी नाशिकचे अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली असून सातपुते यांना पदस्थापना देण्यात आलेली नाही.



राज्याच्या गृह विभागाने राज्यातील २४ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. त्यामध्ये सोलापूर पोलीस अधीक्षक पदी सरदेशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तेजस्वी सातपुते यांनी ऑपरेशन परिवर्तन राबवून हातभट्टी दारू तयार करणाऱ्या ग्रामस्थांना इतर व्यवसायाकडे वळवले हा त्यांचा उपक्रम लोकसभेमध्ये चर्चेचा विषय ठरला होता. चांगले काम होत असताना केवळ दोन वर्षाच्या आतच सातपुते यांची बदली करण्यात आली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लोक अशीकशी काय फसतात ?

| कल्याण |
|---|
| --------- |

| मेन बाजार |
|---|
| --------- |

# उड्डाणपूल अॅवॉर्डसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवा

## ❑ आयुक्त शिवशंकर यांची भूसंपादन अधिकाऱ्यांना सूचना

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील होणाऱ्या प्रस्तावित दोन उड्डाणपूलांच्या पैकी जुना पुना नाका ते पत्रकार भवन या फेज वन मधील उड्डाण पुलाच्या अवॉर्डसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव देण्यासाठी भूसंपादन अधिकारी केशव जोशी यांना सूचना देण्यात आल्याचे महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली.

महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी उड्डाणपूलासंदर्भात गुरुवारी सार्वजनिक बांधकाम विभाग, भूसंपादन विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी आणि महापालिका अधिकारी यांची संयुक्त बैठक घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांना माहिती दिली. शहरातील होणाऱ्या प्रस्तावित दोन उड्डाणपूलांच्या पैकी जुना पुना नाका ते पत्रकार भवन या फेज वन मधील उड्डाण पुलाच्या अवॉर्डसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव देण्यासाठी भूसंपादन अधिकारी केशव जोशी यांना सूचना देण्यात आली आहे. याचे मूल्यांकनाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. दरम्यान, उड्डाणपुलासाठी बाधित होणाऱ्या शासकीय जागा पॅकेज न देता विनामूल्य देता येते असे नगर विकास विभागाच्या सचिवांनी सांगितले आहे. त्यानुसार महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. शिवाय फेज दोन मधील उड्डाणपुलाचे ७० टक्के मूल्यांकन काम पूर्ण झाले आहे.



भूसंपादनाचे अवॉर्डचे काम पूर्ण झाल्यानंतर पूर्वीचे ८०० कोटींचे अंदाजपत्रक १२०० कोटींवर गेल्याने यानुसार टेंडर काढण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी सांगितले.

### ▪ अॅवॉर्डसाठी दिवाळीनंतरच मुहूर्त लागणार

जुना पूना नाका ते पत्रकार भवन या फेज एकचे अंतिम मूल्यांकनही पूर्ण झाले असून टप्प्याटप्प्याने अवॉर्ड प्रक्रिया सुरू करण्यासाठी भूसंपादन विभागाला आयुक्त पी. शिवशंकर यांनी आदेश दिले आहेत. मात्र दिवाळीपूर्वी होणारी अवॉर्ड प्रक्रिया आणखी पंधरा दिवस लांबणीवर आहे. त्यामुळे ॲवॉर्डला दिवसाळीनंतरच मुहूर्त लागणार आहे.

### ▪ बसस्थानकात ये-जा करण्यासाठी स्वंतत्र रस्ता

शहरात होणाऱ्या उड्डाणपुलात सोलापूर बसस्थानकाचीही जागा जाणार आहे. मात्र त्यांना मोबदला न देता स्थानकात गाड्यांची ये-जा करण्यासाठी स्वंतत्र रस्ता करण्यात येणार असल्याचे आयुक्त शिवशंकर यांनी सांगितले.

# सहा महिन्यात मंडई विभागाने पकडली ४९९ मोकाट जनावरे

## ४.९१ लाख रुपयांची केली दंडात्मक कारवाई

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका मंडईच्या कोंडवाडा विभागांतर्गत एप्रिल ते १८ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत एकूण ४९९ मोकाट जनावरांना पकडण्यात आले आहे. त्यांच्या मालकांकडून एकूण ४ लाख ९१ हजार ८०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

सोलापूर महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त विक्रमसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडई विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी ही कारवाई केली आहे.

महापालिकेच्या मंडई कोंडवाडा विभागाच्या वतीने सोलापूर शहरात रस्त्यावर व इतरत्र फिरणाऱ्या मोकाट जनावरे पकडण्याची नियमितपणे जनावरे पकडून दंडात्मक कारवाई करण्यात येते. मोकाट जनावरे पकडून कारवाई केल्यानंतरही पुन्हा ही जनावरे रस्त्यावर सोडली जातात. यामुळे आता संबंधित मालकावरच गुन्हा दाखल करण्यात येणार



असल्याचे महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी स्पष्ट केले आहे.


एप्रिल मध्ये ६२ लहान तर ४ मोठे असे एकूण ६६ मोकाट जनावरे पकडण्यात आली तर त्यांच्या मालकांकडून एकूण ४८ हजार २०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. मे महिन्यात ५१ लहान व ३ मोठे जनावरे पकडण्यात आली असून एकूण ४१ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. जून मध्ये ६१ लहान तर ९ मोठे जनावरे असे एकूण ७० जनावरे ताब्यात घेण्यात आली. एकूण ५५ हजार ९०० रुपये दंड वसूल केला. जुलै महिन्यामध्ये ७९ लहान १६ मोठ्या जनावरांना असे एकूण १०४ जनावरांना ताब्यात घेण्यात आले. एकूण १ लाख ११ हजार ३०० रुपये दंडात्मक कारवाई केली. माहे ऑगस्टमध्ये लहान जनावरे ४२ तर मोठे जनावरे ५ असे एकूण ४७ मोकाट जनावरे पकडण्याची कारवाई केली तर या महिन्यात एकूण ५२ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. सप्टेंबर २०२२मध्ये १११ मोकाट जनावरे ताब्यात घेतली. त्यांच्या मालकांना एकूण १ लाख २४ हजार रुपये दंड आकारण्यात आला. ३ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर दरम्यान ५६ जनावरे पकडण्यात आली तर एकूण ५९ हजार रुपये दंडात्मक कारवाई केली आहे. एप्रिल ते १८ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत एकूण ४९९ मोकाट जनावरांना महापालिकेच्या या पथकाकडून पकडण्यात आले. ४ लाख ९१ हजार ८०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

### इतका आकारला जातो दंड

महापालिका मंडई (कोंडवाडा) विभागाच्या वतीने मोकाट जनावरांना पकडून त्यांच्या मालकांकडून दंड वसूल करण्यात येतो. मोठ्या एक जनावरासाठी १ हजार ८०० रुपये दंड व वैरणासाठी दोनशे रुपये असे एकूण २ हजार रुपये आकारण्यात येतात तर लहान एका जनावरासाठी ८०० रुपये दंड व दोनशे रुपये वैरण खर्च असे एकूण १ हजार रुपये रक्कम आकारण्यात येते.

### पोलीस बंदोबस्तात कारवाईचे नियोजन

महापालिका मंडईकडील कोंडवाडा विभागाच्या वतीने शहरात मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम राबविताना मोकाट जनावरांचे मालक अडथळा निर्माण करत असल्याच्या घटना अधून मधून घडतात. यामुळे कर्मचाऱ्यांची मोठी अडचण निर्माण होते. त्यामुळे ही कारवाई पोलीस बंदोबस्तात करण्याचे नियोजन आहे. दोन पोलीस कर्मचारी मंडई विभागाकडे देण्याची विनंती केली असल्याचे मंडई विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी सांगितले.



## ओला दुष्काळ जाहीर करून शेतकरी, शेतमजुरांना भरीव मदत द्यावी

सुराज्य/माढा : परतीच्या पावसाने राज्यातील तमाम शेतकरी बंधूच्या शेतीचे अतोनात नुकसान झाले असून संपूर्ण राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून दिवाळीपूर्वी सरकारने भरीव मदत करावी अशी मागणी माढा तालुका कॉंग्रेस पक्षाच्या वतीने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशानुसार कार्याध्यक्षा तथा आमदार प्रणितीताई शिंदे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहितेपाटील आणि युवक नेते दादासाहेब साठे यांच्या मार्गदर्शनाखाली माढा तालुका कॉंग्रेस कमिटीचा वतीने माढा तालुक्याचे तहसीलदार राजेश चव्हाण यांना नुकतेच एक निवेदन दिले आहे. याद्वारे संपूर्ण जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी अतिवृष्टीमुळे मोठ्या संकटात सापडला आहे. याचबरोबर शेतमजुरही मोठ्या संकटात आहे. या नैसर्गिक आपत्तीच्या काळात सरकारने तातडीने पंचनामे करून बाधित शेतकर्यांना मदत करावी. ओला दुष्काळ जाहिर करून हेक्टरी %५ हजार विशेष अनुदान द्यावे, शेतमजूराना विशेष अनुदान द्यावे. केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे भूक निर्देशकांत देशाची १२१ वरून १०७ व्या क्रमांकावर घसरण झाली आहे. भारताची ही प्रतिमा सुधारण्यासाठी शेतकरी हिताचे व्यापक धोरण राबवावे अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. तालुकाध्यक्ष सौदागर जाधव यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हा संघटक जहीर मणेर जिल्हा उपाध्यक्ष उत्तम रणदिवे कार्यकारणी सदस्य सचिन खैरे पाटील उपाध्यक्ष भीमराव बंडगर फिरोज खान हमीद भाई शिकलकर नितीन साठे अरुण कदम विकास साठे अक्रम कुरेशी आदि उपस्थित होते.

## ओंकार साखर कारखाना उसास चांगला दर देणार : पाटील

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याचा तिसऱ्या गळीत हंगामाचा प्रारंभ माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख, चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, , संचालीका रेखा बोत्रे, यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना चेअरमन बाबुराव बोत्रे, यांनी या कारखान्याने दोन गळीत हंगाम यशस्वी पणे पार पाडले आहेत. शेतकऱ्यांनचे हित डोळयासमोर ठेवुन गेल्या वर्षी कारखाना उशीर पर्यत सुरु ठेवला. तोटा सहन करुन कारखाना सुरु ठेवला शासनाकडील अनुदान उपलब्ध होताच पुढील हप्ता देणार आहे. कारखान्याकडे कोणताही उपपदार्थ निर्मिती प्रकल्प नसल्यामुळे कारखान्यास आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. लवकरच डिसलरी, असीटीक ॲसिड, पेट्रोल पंप यांचे काम सुरु करणार आहे. गत वर्षी साडेतीन लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप करणार आहे. महीला शेतकऱ्यांनचा दरवर्षी कारखाण्याच्या वतीने सन्मान करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख यांनी या कारखान्याला सर्वोतोपरी सहकार्य करणार आहे. तसेच पिलीव -माळशिरस रस्त्यांच्या कामाचा पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पंढरपुरचे माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, भाजपचे माजी तालुका अध्यक्ष पांडुरंग वाघमोडे, धानोरचे सरपंच जिवन जानकर, भजनदास चोरमले, बाळासाहेब सरगर, जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, चिप इंजिनिअर देवकते, चिप केमिस्ट विठ्ठल आडत, सुरक्षा अधिकारी निलेश निंबाळकर, क्रुषी अधिकारी गोरे, सर्व खातेप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शेतकरी, वाहन मालक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कवठे ग्रामपंचायतीची अर्थव्यवस्था कोलमडली

सुराज्य/उत्तर सोलापूर : कवठे ग्रामपंचायतचा कारभार उपसरपंचला देऊन देखील उत्तर प्रशासणामुळे गावातील अर्थ व्यवस्था, स्थानिक प्रशासन, गावातील कामे, कर्मचारी पगारी व इतर आर्थिक व्यवस्था कोलमडली आहे. कवठेची सरपंच गायब होऊन तब्बल दीड महिना होत आले. गावाचा कारभार व आर्थिक गाडा चालविण्यासाठी शासनाच्या नियमाप्रमाणे उपसरपंच भीमराव चव्हाण यांना सहीचा अधिकार मासिक बैठकीत घेऊन उत्तरच्या प्रशासन विभागाला रीतसर सादर करण्यात आला. गटविकास अधिकारी, संबधित अधिकारी जागेवर नसल्याने कर्मचारी पगारी, वीज बिल, पाणी पट्टी इतर खर्च देयके पूर्णपणे रखडला आहे. त्वरित सहीचा अधिकार देऊन कामकाज सुरळीत करावे असी मागणी ग्रामपंचायत कर्मचारयातून केली जात आहे.

## घरासमोरील मोटरसायकलची चोरी

सुराज्य/सोलापूर : घरासमोर हँडल लाक करून ठेवलेली काळा रंगाची होंडा यूनिकॉर्न मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार कुलदीप बाळासाहेब लामकाने यांनी सदर बाजार पोलिसांना दिले आहे. या घटनेची हकिकत अशी की, मोदीखाना येथील श्रध्दा विहार अपार्टमेंट मध्ये राहणाऱ्या कुलदीप लामकाने यांनी आपली स्वतःची मोटरसायकल क्रमांक एम. एच. १३ बी. पी. ९११८ घरासमोर पार्क करून ठेवली असताना चोरून नेली. सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, अधिक तपास पोलीस नाईक सरतापे हे करीत आहेत.

## सलून दुकानासमोरील दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर : एमआयडीसी परिसरातील विजयनगर येथील न्यू गणेश हेअर कटिंग सलुन समोर पार्किंग करून ठेवण्यात आलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवून नेली. या घटनेची हकीकत अशी की, राजू लक्ष्मण शिवरात्री (वय-२६, रा. गिरी झोपडपट्टी, लालबावट ऑफिस शेजारी सोलापूर) याने आपल्या मालकीची मोटर सायकल क्रमांक एम. एच. १३. सी. एम. १५०८ ही पार्क करून ठेवले असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली. एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, अधिक तपास पोलीस नाईक गायकवाड हे करत आहेत.

## निधन वृत्त

### रुक्मीणिबाई यन्नम



सुराज्य/सोलापूर : गीता नगर येथील रहिवासी रुक्मीणिबाई भूमय्या यन्नम यांचे गुरुवार, दि. २० ऑक्टोबर रोजी निधन झाले आहे. शुक्रवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी सकळी ९ वाजता राहात्या घरापासून येथून अंत्ययात्रा निघणार आहे. पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त दिनेश यन्नम यांच्या त्या मातोश्री होत.

## खर्गे यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस उभारी घेईल : प्रा. कुलकर्णी

सुराज्य/सोलापूर : कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी खासदार मल्लिकार्जुन खर्गे यांचा विजय लोकशाही पध्दतीने झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली मोदी शहा या हुकूमशाही जोडगळीचा अहंकाराचा पराभव करेल व देशात कॉंग्रेसला उभारी देईल असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे प्रदेश प्रवक्ते प्रा. काकासाहेब कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे.

कॉंग्रेसमध्ये अध्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून येतो. इतर पक्षासारखा अध्यक्ष लादला जात नाही. सर्व धर्म समानता असणारा एकमेव पक्ष असून निश्चितपणे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून मल्लिकार्जुन खर्गे हे आपल्या कार्याचा ठसा उमटतील देशात व राज्यात त्यांच्या नेतृत्वाखाली व त्यांच्या अनुभवामुळे कॉंग्रेसला उभारी मिळेल असे म्हणत काकासाहेब कुलकर्णी यांनी निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

## एम.के. फाउंडेशनमुळे निराधार, कामगारांची दिवाळी गोड

सुराज्य/अक्कलकोट

भारतीय संस्कृतीत सर्वात मोठा समजला जाणारा सण म्हणजे दिवाळी. अनेक लोकांना हा सण आपल्या वैयक्तिक किंवा आर्थिक अडचणीने आनंदात साजरा करता येत नाही. अडचणींमुळे त्या आनंदावर विरजण घालावे लावते. अश्या निराधार आणि गरीब बांधवांची दिवाळी सुध्दा गोड व्हावी, या उदात्त हेतूने एम. के. फाउंडेशनच्या माध्यमातून दरवर्षी फराळ आणि ग्रहउपयोगी साहित्यांची वाटप करण्यात येते.

यावर्षी सुध्दा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या चांगल्या



उपक्रमाची सुरुवात नीलम नगर आणि माशाळ वस्ती येथील शेकडो कामगार व निराधार बांधवांना फराळ साहित्याच्या वाटपांने करण्यात आली. यावेळी एम.के. फाउंडेशनचे संस्थापक महादेव कोगनुरे, संचालक राधाकृष्ण पाटील, भैरण्णा भैरामडी, श्रीकांत भरले, शिवा उप्पलवार, सुनील झळके, संकेत चंदनशिवे, शिवाजी राठोड, अजित पाटील, महांतेश बगले, मल्लिकार्जुन दारफळे, विशाल धोत्रे, चिरंजीव सितारे, मल्लेश संकुल आदीसह मोठ्या संख्येने कामगार बंधाव उपस्थित होते.

दरवर्षी फाउंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम आम्ही राबवित असतो. दरवर्षी ५०० गरीब कुटुंबाना फराळ वाटप केल्यावरच मी स्वतःसाठी खरेदी करत असतो. सण आणि उत्सवांचा आनंद समाजातील प्रत्येक घटकांनी घ्यावा यासाठी हे उपक्रम राबवित आहोत.

## सिंहगडमध्ये 'टेक्नोसिंह २के२२'आणि 'आविष्कार' उत्साहात



सुराज्य/सोलापूर

केगांव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात टेक्नोसिंह २के२२ आणि आविष्कार-कॉलेज लेव्हल हा तांत्रिक महोत्सव उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. श्रीराम राऊत, महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी शशांक देशमुख आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी टेक्नोसिंह २के२२ मध्ये कोड विथ सी, टेक्निकल क्विझ अँड कोडींग, ॲपटीट्यूड क्विझ, सोशल शॉर्ट फिल्म, कॅडवार अशा टेक्निकल इव्हेंटमध्ये सहभाग घेतला. आविष्कार या सेंट्रल लेव्हल इव्हेंटमध्ये विद्यार्थ्यांनी प्रोजेक्ट आयडिया आणि पोस्टर प्रेझेंटेशन सादर केले. या विविध स्पर्धेमधून एकूण ४७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अशा तांत्रिक महोत्सवातून विद्यार्थ्यांची कल्पकशक्ती विकसित होते. विद्यार्थीदशेत तांत्रिक महोत्सवामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास विकसित होत असतो.

यावेळी उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, डॉ. शेखर जगदे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सुनील शाखापूरे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. सुमेध पाठक आणि प्रा. सुनील शाखापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली जनरल सेक्रेटरी चिन्मय झोड, ओंकार कोठे, सुजाता दूधभाते, नोमन शेख, कृष्णात कापसे, शाकिब शेख, मुस्तफा शेख यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून डॉ. श्रीराम राऊत, शशांक देशमुख, अविनाश लावणीस यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे सूत्रंचालन ऋतुजा राऊत व सुझान नदाफ यांनी केले.

## किशोरी खो-खो स्पर्धेसाठी प्राजक्ता बनसोडेची निवड

सुराज्य/सोलापूर : रत्नागिरी येथे ३७ वी किशोर / किशोरी राज्यस्तरीय खोखो स्पर्धा दिनांक १६ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर दरम्यान संपन्न झाली.

या स्पर्धेत किशोर गटात राज्यात सोलापूर जिल्ह्याला ६ वा क्रमांक तर मुलींच्या गटाला राज्यात पाचवा क्रमांक मिळाला. या स्पर्धे मधून वेळापूर येथील इंग्लिश स्कूल वेळापूरची विद्यार्थिनी व अर्धनारी नटेश्वर खोखो क्लब वेळापूरची सदस्य कु. प्राजक्ता सोमनाथ बनसोडे हिची दि. २९ ऑक्टो ते २ नोव्हें. २२ दरम्यान फलटण जिल्हा सातारा येथे होणार्‍या राष्ट्रीय खो खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कु. प्राजक्ता सोमनाथ बनसोडे हिला राष्ट्रीय प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, राष्ट्रीयपंच जावेद मुलाणी, भरत अवार्ड विजेता जावेद आतार, क्रीडा शिक्षक सतीश कदम, श्रीनाथ खटके, शिवाजी जाधव संघव्यवस्थापक वनिता ढवण या सर्वांचे मार्गदर्शन लाभले. प्राजक्ता बनसोडे व तीला मार्गदर्शन करणारे शिक्षक या सर्वांचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, जि प सदस्य बाळासाहेब धाईंजे, वेळापूर सरपंच सौ. विमलताई जानकर, उपसरपंच जावेद मुलाणी तसेच ग्रामपंचायत सदस्य संजयआबा मंडले, संदीपतात्या माने देशमुख, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, लखन मंडले, पोलीस शहाजी मंडले, राष्ट्रवादी कॉंग्रेस सामाजिक न्याय विभाग तालुका अध्यक्ष रजनीश बनसोडे, धानोरे सरपंच जीवन जानकर, भाऊसाहेब जानकर, यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले.

## भंडाकरवठे-अंत्रोळी रस्त्याबाबत पालकमंत्री विखे यांना निवेदन



सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे-अंत्रोळी हा शासनमान्य ग्रामीण रस्ता (क्र. २३५) जिल्हा नियोजन समितीच्या यादीत समाविष्ट करून या भागातील शेतकऱ्यांच्या हितासाठी सदर रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणासाठी निधी द्यावा, अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

या रस्त्याची आतापर्यंत देखभाल झालेली नाही. काळ्या मातीचा हा रस्ता असून अत्यंत निकृष्ट झाला आहे. आताच्या अतिवृष्टीने तर रस्त्यावर दलदल निर्माण झाली आहे. त्यामुळे बहुतांशी शेतकरी शेतातच अडकून पडले आ-हेत. दरवर्षीची ही समस्या आहे. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी व विद्यार्थिनी व माय-भगिनी यांना यातना सहन कराव्या लागत आहेत. या भागात सिंचन क्षेत्र वाढल्यामुळे शेती मालाची ने-आण बारा महिने सुरू असते. रस्ताच खराब असल्याने वाहतूक करणे त्रासदायक ठरत आहे. तरी शेतकऱ्यांचा हिताचा विचार करून मंत्री महोदयांनी हा रस्ता डीपीसीच्या यादीत समाविष्ट करून त्यावर डांबरीकरणासाठी भरीव निधी मंजूर करावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

### तिसरे पालकमंत्री...

सदर रस्त्याबाबतचा पाठपुरावा गेल्या चार वर्षांपासून सुरू आहे. आघाडी सरकारमधील पहिले पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी जिल्हा नियोजन कार्यालयाला आदेश देऊन कार्यवाही करण्याची सूचना दि. २५-१-२०२० केलेली होती. मात्र आजपर्यंत त्यावर कोणतीच कार्यवाही झालेली नाही. दुसरे निवेदन दत्रात्रय भरणे यांना दिले होते. त्यांनी ३-१२-२०२१च्या निवेदनावर आदेश देऊन झेपीच्या प्रशासनाला यावर कार्यवाही करण्याची सूचना केलेली होती. याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाही१०-१-२०२२ रोजी निवदेन देऊन विंनती करण्यात आली होती. परंतु याकडे डोळेझाक केली जात आहे. पालकमंत्री हे समितीचे अध्यक्ष असतात. त्यामुळे त्यांचा आदेश जिल्हा नियोजन अधिकारी व झेडपीच्या प्रशासनाला बंधनकारक असतो. तरी देखील कार्यवाही होत नाहीय. शासनाने भरणे यांच्या काळात झालेल्या डीपीसीच्या निर्णयांवरील स्थगिती उठवल्याने भरणे यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे झेडपीच्या प्रशासनावर बंधनकारक ठरते, असे जाणकार सांगतात. तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी याकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. सीईओ हे डीपीसीचे पदसिध्द सदस्य आहेत. त्यांना तसा अधिकार आहे, असे सांगितले जाते.

### डीपीओकडे पाठवले जाईल

याबाबत विखे यांचे सोलापूरचे कामकाज पाहाणारे विशेष कार्यकारी अधिकारी यशवंत माने यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सदरचे निवेदन जिल्हा नियोजन कार्यालयाकडे पाठवण्यात येईल, असे 'दै. सुराज्य'शी बोलताना सांगितले.

# राजकीय, सामाजिक आंदोलनातील गुन्हे मागे घेणार

## मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यभरात विविध सामाजिक आणि राजकिय आंदोलनात दाखल केलेले गुन्हा आता मागे घेण्यात येणार आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. ३० जून २०२२ पर्यंत दाखल केलेले खटले मागे घेण्यात येणार असल्याचे या मंत्रिमंडळ बैठकीत ठरवण्यात आले आहे.




राज्यभरात विविध मुद्द्यांवर आंदोलने, मोर्चे होत असतात. कधीकधी कोणत्याही परवानगीशिवाय हे मोर्चे काढले जातात. कधीकधी आंदोलने आणि मोर्चांना उग्र रुप धारण होते. त्यामुळे जमावाला पांगवण्यासाठी आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल केले जातात. या गुन्ह्यांमुळे आंदोलनकर्त्यांना विविध त्रासाला सामोरे जावे लागते. त्यामुळे राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील ३० जून २०२२ पर्यंतचे खटले आता मागे घेण्यात येणार असल्याचे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत ठरवण्यात आले आहे.

### आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेले महत्त्वाचे निर्णय

- नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र इस्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र स्थापन करणार. शासनाला दर्जेदार सल्ला व धोरणात्मक मार्गदर्शन मिळणार
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट- ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड पदभरतीसाठी परीक्षा टीसीएस, आयबीपीएस घेणार. या माध्यमातून ७५ हजार पदे भरण्याचा मार्ग सुकर
- ऐच्छिकरित्या वाहनांचे स्क्रॅपिंग करणाऱ्यांना व्याज व दंडमाफ करणार. भंगार स्थितीतील वाहनांचा प्रश्न सुटणार.
- मराठवाडा, विदर्भ,उत्तर महाराष्ट्रात अल्पसंख्याक महिलांचे २८०० बचत गट निर्माण करणार. १५०० महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण.
- भू विकास बँकेचे कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी. एकूण ९६४ कोटी १५ लाख रुपयांची कर्जमाफी. भूविकास बँकेच्या मालमत्तांचे शासनाकडे हस्तांतरण करणार
- महाराष्ट्र ग्रीबिझनेस नेटवर्क संस्थेस अनुदान स्वरुपात निधी देणार. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे शक्य
- राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील ३० जून २०२२ पर्यंतचे खटले आता मागे घेणार.
- माहिती तंत्रज्ञान तज्ञ विभागातील राजपत्रित पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळणार
- बुलडाणा जिल्ह्यातील अरकचेरी आणि आलेवाडी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता. १९१८ हेक्टर जमिनीला सिंचनाचा फायदा
- राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनीचे भागभांडवल ३११ कोटी करणार.
- महाराष्ट्र आकस्मिकता निधीच्या मर्यादेत २०० कोटींची तात्पूरती वाढ करण्याचा निर्णय.
- १२५० मे टन प्रतिदिन गाळप क्षमता २५०० मे.टन पर्यंत वाढविण्यासाठी शासकीय भागभांडवल देणार.

# मिठाईवर खर्च करून लोकांचे आरोग्य जपा

## फटाकेबंदीविरुद्धची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली





✔ सुराज्य/नवी दिल्ली

**दिल्लीतील फटाक्यांच्या बंदीला आव्हान देणारी याचिका भाजपचे नेते मनोज तिवारी यांनी केली होती. दरम्यान या याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. लोकांना मोकळ्या हवेत श्वास घेऊ द्यावा आणि तेच पैसे मिठाईवर खर्च करण्यात यावेत, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. मनोज तिवारी यांचे वकील शशांक शेखर झा यांनी दिवाळीच सण जवळ आल्याचे कारण देत तातडीने सुनावणीची मागणी केली होती. मनोज तिवारी यांनी २३ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात याप्रकरणी धाव घेतली होती.**

विशेष म्हणजे जगण्याच्या अधिकाराच्या निमित्ताने धर्मस्वातंत्र्य हिरावून घेतले जाऊ शकत नाही, असे याचिकेत म्हटले होते. मनोज तिवारी यांनी फटाके विक्री, खरेदी आणि फोडण्याबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याचे निर्देश सरकारकडे मागितले होते. सर्वोच्च न्यायालयानेच पर्यावरणपूरक फटाके वापरण्यास परवानगी दिलेली असताना त्यांनी सर्वसाधारण बंदीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

आगामी सणासुदीच्या काळात फटाके विकणाऱ्या किंवा फोडणाऱ्या सामान्य लोकांवर एफआयआर नोंदवण्यासारखी कोणतीही दंडात्मक कारवाई करू नये, असे निर्देश सुद्धा देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे २०२० पासून दिल्लीत दिवाळीत फटाके फोडण्यावर बंदी आहे. यासोबतच हरियाणानेही मागील वर्षी आपल्या १४ जिल्ह्यांमध्ये सर्व प्रकारच्या फटाक्यांच्या विक्रीवर आणि वापरावर बंदी घातली होती. मात्र, निर्बंध असतानाही दिल्ली, नोएडा, फरिदाबाद आणि गुरुग्राममध्ये रात्री उशिरापर्यंत लोकांनी फटाके फोडले.

दिल्लीत दिवाळीत फटाके फोडणाऱ्यांना ६ महिन्यांपर्यंत तुरुंगवास आणि २०० रुपयांचा दंड होऊ शकतो. बुधवारी ही माहिती देताना दिल्लीचे पर्यावरणमंत्री गोपाल राय म्हणाले की, दिल्लीत फटाक्यांचे उत्पादन, साठवणूक आणि विक्री केल्यास ५००० रुपयांपर्यंत दंड आणि स्फोटक कायद्याच्या कलम ९ड अंतर्गत ३ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. यासोबतच त्यांनी लोकांना या दिवाळीत फटाके न फोडण्याचे आवाहन केले आहे. लोकांना जागरूक करण्यासाठी दिल्ली सरकारकडून जनजागृती करण्यात येणार आहे. कॅनॉट प्लेसमधील सेंट्रल पार्कपासून याची सुरुवात होईल. येथे ५१ हजार दिवे लावण्यात येणार आहेत.

# वाढीव बांधकाम केलेल्या मिळकतदारांना नोटिसा

## वापरबदल आणि क्षेत्रबदलालाही वाढीव कर आकारणार

✔ **सुराज्य/सोलापूर** : महापालिका प्रशासनाकडून सोलापूर शहर आणि हद्दवाढ भागातील मिळकतींवरील वाढीव बांधकामाची माहिती संकलित करण्यात येत आहे. या वाढीव बांधकामानुसार मिळकत कराची आकारणी केली जाणार आहे. वापरबदल आणि क्षेत्रबदलालाही वाढीव कर आकारण्यात येईल.अशा मिळकतदारांना टप्प्याटप्प्याने सुनावणीसाठी नोटिसा बजावण्यात येत असल्याची माहिती महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली.



शहर आणि हद्दवाढ भागातील अनेक मिळकतदारांना यापूर्वी महापालिका प्रशासन आणि मालमत्ता कर विभागाकडून महापालिकेकडे असलेल्या संकलित नव्या डाटानुसार वाढीव कराच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्या कार्यवाहीला मिळकतदारांसह लोकप्रतिनिधींकडून जोरदार विरोध करण्यात आला होता. यामुळे महापालिका प्रशासनाला काढण्यात आलेल्या त्या हजारो नोटिसा रद्द कराव्या लागल्या होत्या. यामुळे महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसानही झाले होते.

दरम्यान, पुन्हा एकदा महापालिकेने नव्याने मिळकत कर रिविजन प्रमाणे तसेच मिळकतीतील वाढीव बांधकाम क्षेत्र (बिल्टप एरिया) प्रमाणे कर वसुली करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात केली आहे. शहर आणि हद्दवाढ भागात यापूर्वी महापालिकेने नेमलेल्या सायबरटेक आणि यानंतर उर्वरित मिळकतींचे महापालिका विशेष पथकाकडून करण्यात आलेल्या सर्व्हेनंतर याचा मालमत्ता कर विभागाकडे सविस्तर डाटा तयार आहे.

या डाटानुसार ज्या मिळकतदारांनी वाढीव बांधकाम केले आहे. त्यांना त्यांच्या वाढीव बांधकामाचे ठरलेल्या दरानुसार वाढीव कर आकारण्यात येणार आहे. महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडील डाटानुसार शहरातील सर्वच वाढीव बांधकाम मिळकतदारांना नोटीसापाठवण्यात आल्या आहेत. तर विशेष पथकाकडून पुन्हा एकदा एक एक भागाचा टप्पा करून त्याच्या सर्व्हेअंती त्या-त्या मिळकतदारांना वाढीव कराच्या नोटिसा टप्प्याटप्प्याने बजावण्यात येणार आहेत. या अनुषंगाने सध्या महापालिकेकडून अनेक मिळकतींची तपासणी सुरू असल्याचे महापालिका आयुक्तांनी सांगितले. शहरातील वाढीव बांधकामासाठी वाढीव कराच्या सुनावणी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. त्या संबंधित मिळकतदाराला यावर काही हरकत असेल तर नोटीस मिळाल्यापासून २१ दिवसात त्यांचे म्हणणे सादर करावे लागणार आहे. यानंतर यावर सुनावणी घेण्यात येणार आहे. २१ लाखावरील रकमेच्या नोटिसांवरील सुनावणी महापालिका आयुक्त पी. शिवशंकर हे घेणार आहेत.

# पाचकुडवे यांना राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार प्रदान

✔ सुराज्य/मोहोळ



**माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम मिशन व ड्रीम फाऊंडेशन यांच्यावतीने दिला जाणारा यावर्षीचा राज्य स्तरीय डॉ. अब्दुल कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार मोहोळ येथील राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक अशोक पाचकुडवे याना प्रदान करण्यात आला.**

बालगंधर्व रंगमंदीर पुणे येथे त्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. अशोक पाचकुडवे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी आयएएस अधिकारी व पुणे यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता समितीचे कक्ष अधिकारी मंगेश चिवटे, पोलीस आयुक्त आंकुश शिंदे, यशदा पुणे येथील अधिकारी डॉ. बबन जोगदंड, संपादक संजय आवटे आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी उद्योगपती नवनाथ येवले, उद्योगपती दत्तात्रय निडवांचे, पुणे व्यवसाय प्रशिक्षण प्रदेशिक कार्यालयाचे सहसंचालक चंद्रकांत निनाळे, संयोजक काशीनाथ भतगुणकी, संगीता पाटील, प्राचार्य सुधीर गायकवाड, पोलीस निरीक्षक बापूसाहेब मोहिते, निवृत्त स्टेट बँक आधिकारी, भुजंगराव पाचकुडवे, नगरसेविका अलका पाचकुडवे, अभियंता मोहन लंगर, प्राचार्य बी. डी. शिंदे, मुख्याध्यापक अशोक शिंदे, बहुजन रयत परिषदेच्या प्रदेश अध्यक्षा कोमल ढोबळे - साळुंखे, शिव व्याख्याते संदीप तापकीर आदी मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्रात आता नव्या जातींची नोंद

## म्हशीची पुर्णाथडी आणि गायीच्या कठाणी जातीची भर

## भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय पशु अनुवंशिक संसाधन ब्युरोने दिली मान्यता

✔ सुराज्य/सोलापूर

**दुधाची वाढती गरज लक्षात घेता सर्वच पशुधनांमध्ये संकरीकरण झाले. त्यामुळे बऱ्याच पशुधनाच्या देशी जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. महाराष्ट्रात म्हशीच्या तीन तर गायीच्या साहा जाती आढळतात. यामध्ये आता म्हशीची पुर्णाथडी जात आणि गायीच्या कठाणी जातीची भर पडली आहे. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो ने म्हशीच्या पुर्णाथडी जातीला आणि गाईच्या कठाणी जातीला मान्यता दिली आहे. त्यामुळे या गाइचे आणि म्हशीचे आता एक स्वतंत्र स्थान निर्माण होऊन महाराष्ट्रातील नोंदणीकृत म्हशींची संख्या तीन वरुन चार झाली आहे तर गाईंची संख्या सहावरुन सात झाली आहे. पुर्णाथडी म्हैस, कठाणी गाय आणि नोंदणीकरण याविषयी पशुतज्ज्ञ सजल कुलकर्णी यांनी दै. 'सुराज्य' शी बोलताना दिली.**

**पुर्णाथडी म्हशीची वैशिष्ट्ये**

प. विदर्भामध्ये अमरावती, अकोला आणि बुलडाणा या जिल्ह्यातील पूर्णा नदीच्या काठी पुर्णाथडी म्हशी आढळून येतात. मध्यम आकारमान, दुधातील उच्च स्निग्धांश, उत्तम प्रजननक्षमता, कमी व्यवस्थापन खर्च आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे विदर्भातील उष्ण हवामानात तग धरून राहण्याची क्षमता पूर्णाथडी म्हशींमध्ये आहे. त्यामुळे लहान आणि मध्यम पशुपालकांची या म्हशीला पसंती आहे.

**कठाणी गाईची वैशिष्ट्ये**

गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा आणि नागपूरच्या काही भागात ही गाईची जात अढळून येते. येथील भात शेतीमध्ये याच जातीचे बैल शेतीकामासाठी वापरले जातात. या गाई आकाराने लहान आणि जास्त प्रमाणात पांढऱ्या रंगाच्या असतात. या जातींमध्ये उष्ण हवामानात तग धरुन राहण्याची क्षमता जास्त आहे.

**नोंदणीकरणामुळे नेमका काय फायदा होईल ?**

या जातीवर शासन अधिकृतरित्या गुंतवणूक करेल. त्यामुळे या गाई, म्हशींच्या अर्थकारणाला बळ मिळेल. शेतकरी उत्पादक कंपन्या, ब्रीडर्स असोसीएशन तसेच केंद्र सरकारच्या पशुधनाशी संलग्न ज्या काही योजना आहेत त्याचा फायदा या जातीला मिळणार आहे. त्यामुळे पुर्णाथडी जातींच्या संगोपन आणि विकासावर भर दिला जाईल. या म्हशींवर स्थानिक लोकांचा रोजगार अवलंबून असल्यामुळे अर्थकारणाला बळकटी मिळेल. या जातींच्या संवर्धन आणि विकासासाठी विशेष आराखडा तयार करणे गरजेचं आहे.




# नूर चॅरिटेबलच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी तयार करणार : नजीर मुन्शी

✔ सुराज्य/सोलापूर

**स्कॉलर बॅचच्या माध्यमातून आम्ही गुणवंत विद्यार्थी तयार करणार आहोत. विद्यार्थीदशेतच त्यांचा शैक्षणिक पाया मजबूत करणे हा ट्रस्टचा मुख्य उद्देश आहे. या महत्त्वकांक्षी उपक्रमाद्वारे देशासाठी उत्तम नागरिक तयार करणे हे आमचे ध्येय आहे, असे प्रतिपादन नूर चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष नजीर मुंशी यांनी केले.**

नूर चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने युनियन एज्युकेशन सोसायटी, उर्दू प्राथमिक शाळा व दी प्रोग्रेसिव्ह उर्दू प्राथमिक शाळा येथील इयत्ता चौथीच्या ४० विद्यार्थ्यांची यांची निवड एका चाचणीद्वारे करण्यात आली आहे. या सर्व निवडलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. पारितोषिक वितरण समारंभ युनियन एज्युकेशनचे नजीर शेख, प्रोग्रसिव्हचे उपाध्यक्ष डॉ. हाजी इलियास शेख यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला. यावेळी मुनाफ शेख, फहमुनिस्सा सय्यद, इक्बाल अन्सारी, प्रा. जैनोद्दीन पटेल, प्रा. शफी चोबदार आदी उपस्थित होते.

यावेळी प्रोग्रेसिव्हचे उपाध्यक्ष डॉ. हाजी इलियास शेख म्हणाले, 'स्पर्धात्मक युगात विधार्थ्यांना प्रत्येकी स्पर्धमध्ये तयार करण्यासाठी सुरु केलेला नूर ट्रस्टचा हा उपक्रम प्रेरणादायी आहे. मुनाफ सुभेदार यांनी स्कॉलर बॅचची रूपरेषा व अभ्यासक्रमाबद्दल पालकांना मार्गदर्शन केले.' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेहमुद नवाज यांनी केले.



# ओम इंग्लिश स्कूलमध्ये दीपोत्सव उत्साहात साजरा

✔ **सुराज्य/सोलापूर** : हत्तुरे नगर येथील ओम इंग्लिश मीडियम स्कूलच्यावतीने दीपोत्सव सोहळा अत्यंत आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. एलकेजी व यूकेजी विभागातील चिमुकल्यांच्या साक्षीने झालेल्या या उत्सवात तमाम शिक्षिका रमून गेल्या. दिवाळीतील साहित्य आणल्यानंतर साऱ्या चिमुकल्यांचा उत्साह देखील द्विगुणित झाला. चिमुकल्यांच्या किलबिलाटाने उत्सवात चांगलाच रंग भरला. पालकांनी देखील उत्स्फूर्तपणे या कार्यक्रमाला दाद दिली.

संस्थापिका रेखा मळेवाडी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दिवाळीतील पहिला सण वसुबारस, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, भाऊबीज, किल्ले व देवघर या दिवाळी उत्सवातील विविध सणांचे महत्त्व शिक्षिकांनी चिमुकल्यांसह पालकांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना शाळेच्यावतीने फराळ व पणत्या भेट म्हणून देण्यात आल्या. मुख्याध्यापिका खतीमा शेख, मुख्याध्यापिका राजश्री गुड्डेवाडी, दीपाली बोरगावकर, सुनीता बिराजदार, अनुराधा कुलकर्णी, करुणा समदुर्ले, पल्लवी पाटील, काशिनाथ मळेवाडी व ओंकार मळेवाडी, कौस्तुभ कुलकर्णी, कांचन बिराजदार, जयश्री घोडके व रामानंद बोरगावकर यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला. रामानंद बोरगावकर यांनी स्वतः रेखाटलेले भाऊबीजचे पेंटिंग शाळेला भेट म्हणून दिले. चिमुकल्यांनी व पालकांनी एकत्रित आकाशदिवे तयार केले. यावेळी सुमारे साडे तीनशे विद्यार्थ्यांनी आकाश कंदील तयार करण्यात सहभाग घेतला होता.

# पंढरपूर ते घुमान सायकल यात्रेच्या बोधचिन्हाचे प्रकाशन

✔ **सुराज्य/वेळापूर** : श्री क्षेत्र पंढरपूर (महाराष्ट्र) ते श्री क्षेत्र घुमान (पंजाब) या संत नामदेव महाराज रथ व सायकल यात्रेच्या बोधचिन्हाचे प्रकाशन पंजाबचे राज्यपाल महामहीम बनवारीलाल पुरोहित यांच्या हस्ते चंदीगड येथील राजभवनात करण्यात आले.

यावेळी भागवत धर्म प्रसारक समिती अध्यक्ष सूर्यकांत भिसे, उपाध्यक्ष शंकर टेमघरे, योगी निरंजननाथ, नामदेव समाजोन्नती परिषद सचिव डॉ. अजय फुटाणे, ॲड. विलास काटे, उपाध्यक्ष संजय नेवसकर आदी उपस्थित होते. राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांना यावेळी यात्रेबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली व सायकल यात्रेचे निमंत्रण देण्यात आले. भागवत धर्म प्रसारक समिती, पालखी सोहळा पत्रकार संघ व नामदेव समाजोन्नती परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीक्षेत्र पंढरपूर ते श्रीक्षेत्र घुमान ही २३०० किलोमीटरची सायकल यात्रा दि. ४ नोव्हेंबर ते दि. ४ डिसेंबर २०२२ या दरम्यान काढण्यात येणार आहे.

या सायकल यात्रेत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर सायकल रायडिंग केलेल्या व ५० पेक्षा अधिक वयोमान असलेल्या १०० पेक्षा अधिक सायकलपटूंनी सहभाग नोंदविला आहे. ही सायकल यात्रा महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान व हरियाणा राज्यातून पंजाबला जाणार आहे.

# 'बड़ा कौन..?' लघुकथा संग्रहाचे प्रकाशन, वाचन व सत्कार समारंभाचे आयोजन

✔ **सुराज्य/सोलापूर** : लघुकथा वाचन, विविध पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा सत्कार, उर्दूचे ज्येष्ठ साहित्यिक, चित्रकार शेख शकील लिखित 'बडा कौन..?' या लघुकथा संग्रहाचा प्रकाशन समारंभाचे आयोजन केले आहे.

उर्दू विकास फौंडेशन व इंडियन युथ असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शमा उर्दू स्कूल सिध्देश्वर नगर, सोलापूर येथे शनिवारी, २२ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेअकरा वाजता होणार आहे. कवी मुबारक शेख, डॉ. सुरया जहागीरदार, डॉ. इक्बाल धोटेकर यांना विविध पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती अबुबकर नल्लामंदू, सुलतान अख्तर यांनी दिली. या समारंभाचे उद्घाटन प्राचार्य इक्बाल तांबोळी यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी बीडचे उर्दू साहित्यिक अर्शद सिद्दीकी असतील. प्रमुख पाहुणे म्हणून चांद अकबर गुलबर्गा शकील शेख, औरंगाबाद, ज्येष्ठ साहित्यिक नदीम मिर्जा बीड, अय्युब नल्लामंदू यांची उपस्थिती असणार आहे. प्रकाशन सोहळयास सोलापूरकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक सुलतान अख्तर यांनी केले आहे.



# जिल्हा परिषदेने केली सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

✔ **सुराज्य/सोलापूर** : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन, शाखा सोलापूर यांच्यावतीने सालाबादप्रमाणे यंदाही जिल्हा परिषद मुख्यालय, पंचायत समिती उत्तर, दक्षिण, यशवंत नगर वसाहतमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी स्वच्छता कर्मचारी व सुरक्षा रक्षकांची दिवाळी गोड बनवली. त्यांना फराळ, कपडे व सुगंधी वस्तूंचे वाटप मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसिंह पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन चंचल पाटील, उपमुख्य लेखा वित्त अधिकारी उत्तम सुर्वे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पंडित भोसले आदी उपस्थित होते. सदरच्या कार्यक्रमात ३० मुख्यालय स्तरावरील, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर येथील ११ सुरक्षा व स्वच्छता रक्षक अशा एकूण ४१ कर्मचाऱ्यांना साहित्याचे वाटप केले.

प्रास्ताविक राज्य सरचिटणीस विवेकानंद लिंगराज यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. एस. पी. माने यांनी केले. आभार राकेश सोडी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजीव गाडेकर, त्रिमूर्ती राऊत, श्रीशैल्य देशमुख, श्रीधर कलशेट्टी, नवनाथ वास्ते, संतोष शिंदे, विशाल घोगरे, चेतन भोसले, कैलास जिंदे, आदींनी परिश्रम घेतले.

# कार्तिक यात्रेत भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी

## प्रांताधिकारी गजानन गुरव यांच्या सूचना

✔ सुराज्य/पंढरपूर



कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. ४ नाव्हेंबर २०२२ रोजी कार्तिकी एकादशी असून यात्रेचा कालावधी २६ ऑक्टोंबर ते ८ नोव्हेंबर २०२२ आहे.

परतीच्या सतत पडणाऱ्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात पंढरपूर शहरातील तसेच शहराकडे येणाऱ्या रस्त्यांवर खड्डे पडले असल्याने प्राधान्याने खड्डे बुजवून स्वच्छता करावी. यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांची कोणतेही गैरसोय होणार नाही याची दक्षता सर्व संबधित विभागाने घ्यावी अशा, सूचना प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिल्या. कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांच्या सोयी सुविधासाठी प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबत शासकीय विश्रामगृह पंढरपूर बैठक घेण्यात आली. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, मुख्याधिकारी अरविंद माळी, पोलीस निरिक्षक धनंजय जाधव, मिलींद पाटील, अरुण फुगे, मंदीर समितीचे लेखाधिकारी अनिल पाटील, वैद्यकिय अधिकारी डॉ.प्रदीप केचे, पशुसंवर्धनचे सहा.आयुक्त डॉ. भिंगारे तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रांताधिकारी गुरव म्हणाले, यात्रा कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणीपुरवठा करावा, परतीच्या पावसामुळे शहरात विविध ठिकाणी पाणी साठल्यामुळे डासांची उत्पती वाढण्याची शक्यता असल्याने तात्काळ फवारणी करुन घ्यावी. चंद्रभागा वाळवंटात पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे,धोकादायक इमारतींवर ठळक सूचना फलक लावावेत. अनाधिकृत फलक काढावेत.मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा. मंदीर समितीने व नगरपालिकेने प्रदक्षिणा मार्ग, नदीपात्रात आवश्यक ठिकाणी बॅरकेटींग करावे व अग्निशामक यंत्रणा कार्यरत ठेवावी .

आरोग्य विभागाने तज्ञ डॉक्टरांसह वैद्यकिय पथकाची नेमणूक करावी. तसेच फिरते वैद्यकिय पथक, ऑक्सिजन, रक्तपुरवठा तसेच मुबलक औषधसाठा उपलब्ध राहील याबाबत नियोजन करावे.कार्तिकी यात्रा कालावधीत मंदीर समितीने जादाचे पत्राशेड उभारावेत, दर्शन रांगेत ठिकठिकाणी सूचना फलक लावावेत. दर्शनरांगेत व दर्शन मंडपात भाविकांना स्वच्छ पिण्याच्या व्यवस्था करावी, मोकाट जनावरे एकाच ठिकाणी येतील याबाबत नियोजन करावे. अन्न. व औषध प्रशासनाने अशा सूचनाही प्रांताधिकारी गुरव यांनी दिल्या.

**■ जादा हॉकर्स पथकाची नेमणूक करा : कदम**

यात्रा कालावधीत वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी तसेच भाविकांना सुरक्षेबाबत कोणतेही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केल्याचे उपविभागीय अधिकारी विक्रम कदम यांनी सांगितले. शहरातील पार्कीग ठिकाणची लेव्हलिंग करुन झाडे-झुडपे काढावेत तसेच प्रकाश व्यवस्था करावी.मंदिर व परिसरात फिरत्या विक्रेत्यांमुळे मोठ्या प्रमाणात भाविकांना त्रास होतो यासाठी जादा हॉकर्स पथकाची नेमणूक करावी असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**■ स्वच्छ पिण्याचे पाणी देण्याची तयारी सुरू**

यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे यासाठी बोअरवेल, हातपंपाची पाणी तपासणी करण्यात येत आहे. पावसामुळे शहरात पडलेले खड्डे बुजविण्याचे काम सुरु असून, स्वच्छतेसाठी जादा हंगामी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. ६५ एकरमध्ये भाविकांच्या सुविधेसाठी पाणी, वीज, स्वच्छता आदी सुविधा देण्यात येणार आहेत. तसेच शहरात वेळोवेळी जंतनाशक फवारणी करण्यात येत असल्याचे मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी सांगितले.

## अंबिका नगरात घरफोडी; लाखांचे दागिने पळविले

✔ **सोलापूर** : नई जिंदगी परिसरातील अंबिका नगर भाग २ येथे राहणाऱ्या सविता बाळू माळवदकर या देव कार्यानिमित्त बाहेर गेलेल्या असताना अज्ञात चोरट्याने घरफोडी करून लॉकरमधील एक लाखाचे दागिने चोरून नेले. या घटनेची हकीकत अशी की,सविता माळवदकर या आपल्या माहेरी जुना पुना नाका येथील उमा नगरी येथे देवकार्य असल्याकारणाने घराला लॉक लावून गेले असताना अज्ञात चोरट्याने घरातील किचनच्या दरवाजा तोडून प्रवेश करत कपाटाची लोखंडी लॉक तोडून लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे नेकलेस,सोन्याच्या सरपाळ्या, सोन्याचे गंठण,सोन्याचे जीरामणी,मनी मंगळसूत्र,चांदीचे पैंजण असा जवळपास ९७ हजार रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने पळविला.एमआयडीसी पोलीस ठाण्यात घटनेची नोंद झाली असून अधिक तपास पोलीस हवालदार पाटील हे करीत आहेत.

## विवाहितेचा छळ; सासरच्यांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : नवऱ्याने दुसरे लग्न केले तसेच माहेरून हुंड्याचे पैसे व दागिने आणले नाहीस म्हणून मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासू-सासरे दिराच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेची हकीकत अशी की, पीडित विवाहिता तबस्सुम नजीर सय्यद ही आपले पती नजीर हुसेन सय्यद,सासू रबावी सय्यद,सासरे हुसेन सय्यद, दिर इलाही सय्यद (रा.सर्वजण खेड पाटी तालुका उत्तर सोलापूर, सध्या बेडर गल्ली, वैराग) येथे राहत असून पतीने माहेरून हुंड्याचे पैसे व दागिने आणले नाही म्हणून मारहाण केली तसेच पतीने करिष्मा मुबारक मुल्ला (रा.निम्बर्गी,तालुका चडचण विजापूर) या महिलेशी दुसरे लग्न केले, अशी फिर्याद दिली आहे.या घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## टाकळी येथील पाईन लाईन फुटली; ऐन सणात पाणीपुरवठा विस्कळीत

✔ सुराज्य/सोलापूर

ऐन सणासुदीच्या काळात सोलापूर शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. टाकळी येथील पाईप लाईन फुटल्याने शहराला १ दिवस उशिरा पाणीपुरवठा होणार असल्याचे पालिकेने कळवले आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या सोरेगाव पंप हाऊस मधील महावितरणाची लाईन खराब झाल्यामुळे टाकळी येथील पंप बंद करण्यात आला होता. एम एस ई बी चे काम गुरूवारी दुपारी तीन वाजता करण्यात आने आहे. तत्पूर्वी टाकळी येथील वैष्णवी पेट्रोल पंप च्या शेजारी मेन सोलापूरला येणारी पाईपलाईन खालील भागात तीन ठिकाणी फुटल्याने पाणी सर्व तिथेच जात होते. त्या ठिकाणी पाईपलाईन दुरुस्तीचे काम गुरूवारी करण्यात आले. ही पाईप संपूर्ण कुजल्याने त्या ठिकाणी रिपेअर चे काम दीड वाजेपर्यंत पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला. त्यामुळे सोलापूर शहरात पाणीपुरवठा १ दिवसात उशिरा होणार असून नागरिकांनी मनपा सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

गुरूवारी आयुक्त पि.शिवशंकर यांनी टाकळी पंप हाऊस तसेच टाकळी येथिल सोलर सिस्टीम आणि ज्या ठिकाणी पाईपलाइन फुटली आहे, त्या ठिकाणी पाहणी करत कुजलेले पाईप त्वरित बदलावे असे आदेश आयुक्त यांनी दिले.

## अल्पवयीन तरुणीची आत्महत्या

✔ **सोलापूर** : अभ्यास कर म्हणून आई-वडील सांगितले असता रागाच्या भरात एका १६ वर्षीय अल्पवयीन तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बीबीदारफळ (ता.उत्तर सोलापूर) येथे बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. ऐश्वर्या धनाजी मोरे (वय १६ रा. बिबीदारफळ) असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे. तिने घरातील छताच्या अँगलला दोरीने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून यशवंत मोरे यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र ती उपचारापूर्वीच मयत झाली. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## दारूच्या नशेत विष पिऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : वाफळे (ता.मोहोळ) येथे राहणाऱ्या देविदास बलभीम दाडे (वय ६०) याने दारूच्या नशेत विष पिऊन आत्महत्या केली. बुधवारी दुपारच्या सुमारास त्याने गावातील वस्तीवर हा प्रकार केला होता. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारा दरम्यान तो गुरुवारी सकाळी मरण पावला. नोंद तालुका पोलिसात झाली आहे.






# शासनाच्या दिवाळी किट वाटपाचा शहरात धुमधडक्यात शुभारंभ

## माजी पालकमंत्री. नगरसेवक, अधिकाऱ्यांच्या हस्ते किटचे वाटप

✔ सुराज्य/सोलापूर



राज्य शासनाच्या वतीने रेशन दुकान प्रणालीच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या आनंदचा शिधाचे शहराच्या विविध भागात मोठ्या दिमाखात शुभारंभ केला. गुमास्ता कंझ्युमर्स सोसायटीत माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते जिल्हापुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, अन्न धान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांच्या प्रमुख उपस्थित किटचे वाटप करण्यात आले. यावेळी सुनिल पेंटर आणि नितीन पेंटर बंधुच्या वतीने दिवाळी किट बरोबर ग्राहकांना मोती साबण, सुगंधी तेल, उटण्याचे किट शासनाच्या किट बरोबर मोफत देऊन गोर गरिबांची दिवाळीचा आनंद द्विगुणित केला.

राज्य शासनाने राज्यातील दिवाळी गोड करण्याचा निर्णय घेत फक्त शंभर रूपयात आनंदाचा शिधा संचामध्ये १ किलो चनादाळ,१ किलो साखर,१ किलो रवा,१ लिटर पामतेल वाटपाचा निर्णय घेतला. बुधवारी रात्री सर्व साहित्या सोलापूरात दाखल झाल्यानंतर जिल्हा पुरवठा विभाग आणि अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी शासनाच्या किटच वाटपाचे नियोजन केले. कन्ना चौकातील गुमास्ता कंझ्युमर्स सोसायटीचे शॉप मॅनेजर सुनिल पेंटर यांच्या दुकानापासून शहरात शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक डॉ.किरण देशमुख, जिल्हापुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांच्यासह उपाध्यक्ष वहाब शेख,राज कमटम, अभिजीत सड्डो, बसवराज बिराजदार, श्रीनिवास पेंटर, सचिन तांबे, गोविंद कैंची,जिल्हा प्रमुख नितीन पेंटर यांच्यासह लाभार्थ्या उपस्थित होते.

अन्नधान्य वितरण विभागाच्या वतीने माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख आणि अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मड्डी वस्ती, जुनी विडीघरकुलम धोत्रीकर वस्ती, शेळगी आणि बाळे परिसरारात किट वाटपाचा शुभारंभ केला. धोत्रीकर वस्ती येथे भर पावसात देशमुख आणि शिंदे यांनी किट वाटपाचा शुभारंभ करत पावसातच किटचे वाटप केले. जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे यांनी शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील खेड आणि कोंडी गावामध्ये किट वाटपाचे नियोजन केले.

आ, विजयकुमार देशमुख यांच्या प्रमुख उपस्थित दोन्ही गावामध्ये किटचे वाटप केले तर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील जुळे सोलापुरात आ. सुभाष देशमुख यांच्या उपस्थित किटचे वाटप केले.

> जिल्हामध्ये किटमधिल संपूर्ण साहित्य आले नाही मात्र जे साहित्य उपल्बध झाले आहे. त्यांचे वाटप चालू केले आहे. दोन दिवसात दोन वस्तू आल्यानंतर जिल्हातील साडेचार लाख लाभार्थ्यांना किटचे वाटप पूर्ण केले जाणार लोकप्रतिनिधींच्या हस्ते दोन ठिकाणी किट वाटपाचा शुभारंभ केला.
>
> **- वर्षा लांडगे (जिल्हापुरवठा अधिकारी )**

> शासनाचा या चांगला उपक्रम आहे . शिंदे फडणवीस सरकारने चांगला निर्णय घेत गोर गरिबांची दिवाळी गोड केली आहे. या योजनेचा सर्व लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा या किटपासून कोणी वंचित राहणार नाही यांची दक्षत प्रशासनाने घ्यावी
>
> **- डॉ.किरण देशमुख (माजी नगरसेवक)**

## विरंगुळा ग्रुपतर्फे जुळे सोलापुरात पहाट गाणी

✔ **सोलापूर** : माजी उपमहापौर राजेश काळे मित्रपरिवार, विरंगुळा ग्रुप जेष्ठ नागरिक व लेवा पाटीदार समाज बहुउद्देशीय संस्था जुळे सोलापूर, यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीचे अवचित्य साधून रविवार दिनांक २३ ऑक्टोबर रोजी पहाटे साडेपाच वाजता स्वराज प्रस्तुत स्वरप्रभात हा अभंग व भक्ती गीताचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. हा कार्यक्रम हा जुळे सोलापुरातील द्वारकाधीश मंदिरात पहाटे साडेपाच ते सकाळी आठ वाजेपर्यंत होणार आहे. गौतमी जितुरी, जयंत पानसरे (सारेगम फेम) आदी कलाकरांसह एकूण नऊ गायक कलाकार गीत गायनाद्वारे आपली अदाकारीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणार आहेत. तरी जुळे सोलापुरातील ज्येष्ठ नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान विरंगुळा ज्येष्ठ नागरिक संघातर्फे करण्यात येत आहे.

## पडसाळीत ग्राहक सेवा केंद्राची तोडफोड; दीड लाख रुपये घेतले काढून

✔ सुराज्य/कुर्डूवाडी




पडसाळी (ता.माढा) येथील ग्राहकसेवा केंद्रातील साहित्याची मोडतोड करत ड्रॉव्हरमधील १ लाख ४५ हजार रूपये जबरदस्तीने काढून घेत ग्राहक सेवा केंद्रातील गणेश सुर्वे यास दगडाने मारहाण करुन जखमी केले. ही घटना मंगळवार दि.१८ रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास पडसाळी ता. माढा येथे घडली. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गणेश वसंत सुर्वे (रा. पडसाळी) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी गणेश हा मंगळवार दि.१८ रोजी दु.४ वा. त्याचा भाऊ अशोक चालवत असलेल्या सरकारमान्य ग्राहक सेवा केंद्रात बसला असता फिर्यादीच्या ओळखीचे त्यांच्याच गावातील सुदर्शन देशमुख व इतर दोघे जण ग्राहक सेवा केंद्रात आले व तुम्हा दोघा भावांना लय माज आलाय. माझ्या चुलत भावासोबत तुम्ही का भांडण केली म्हणून सुदर्शन हा शिवीगाळ करु लागला. त्यावेळी त्याच्यासोबत आलेल्या इतर अनोळखी दोघांनी खुर्च्यांची मोडतोड करत दुकानाबाहेर फेकून देऊ लागले त्याचवेळी सुदर्शन याने दुकानातील टेबलच्या ड्राव्हरमधील १ लाख ४५ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले व फिर्यादीस दगडाने मारहाण करुन जखमी केले. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात तीघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चारित्र्यावर संशय घेत विवाहितेचा छळ; पतीसह तिघांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेत मारहाण करत तसेच शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह तीन जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२० ऑक्टोंबर २०११ रोजी फिर्यादी यांचे लग्न झाल्यापासून एक महिन्यानंतर ते दि.१ ऑगस्ट २०२२ पर्यंत रोहिणी नगर भाग २ येथे घडली.याप्रकरणी सुहासिनी विश्वनाथ गायकवाड (वय-२२,रा.बहुरूपी नगर,विजापूर रोड सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती विश्वनाथ चंद्रकांत गायकवाड,सासू शारदा चंद्रकांत गायकवाड दीर विनायक चंद्रकांत गायकवाड (सर्व रा.रोहिणी नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचे लग्न झाल्यापासून एक महिन्यानंतर चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करत शारीरिक व मानसिक छळ केला.त्यानंतर सासू व दीर विनायक यांनी पती विश्वनाथ गायकवाड यांना सांगून फिर्यादी सुहासिनी गायकवाड हिला नांदवू नको, ही तुला शोभत नाही,हिला माहेरी हाकलून दे व हुंडा घेतल्याशिवाय नांदायला घेऊ नकोस असे म्हणून हुंड्याची मागणी केली.असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक सोनार हे करीत आहेत.




**दर्शनासाठी गेल्यावर पळवली दुचाकी**

✔ **सोलापूर** : दर्शनासाठी गेल्यावर अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची घटना दि.२६ सप्टेंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान राम मंदिर विनायक नगर एमआयडीसी सोलापूर येथे घडली.याप्रकरणी योगीराज मोहन भेंडे (वय-२३,रा.चूंचू घरकुल,अश्विनी हॉस्पिटल कुंभारी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. योगीराज हे राम मंदिर येथे दर्शनासाठी गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने त्यांची मोटारसायकल क्रमांक एम.एच.१३.ए.एस.४७२८ हि चोरून नेली आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक भांगे हे करीत आहेत.